दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

• (महाराष्ट्र) वर्ष ०१ ले • अंक ३५६ • RNI : MAHMAR/2023/87818 • गुरुवार दि.१० ऑक्टोबर २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# देशासाठी सर्वस्व अर्पण करणारा देवमाणूस हरपला

## संपूर्ण देश टाटा कुटुंबीयाच्या दुःखात सहभागी

मुंबई (वृत्तसंस्था)–ख्यातनाम उद्योगपती रतन टाटा यांचं निधन झालं आहे. वयाच्या ८६ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. मुंबईतील रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु होते. टाटा यांना रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचं वृत्त सोमवारी आलं होतं. त्यानंतर रतन टाटांनीच त्यांच्या प्रकृतीबद्दलची माहिती दिली होती. वाढत्या वयामुळे नियमित वैद्यकीय तपासणी होत असल्याचं टाटांकडून सांगण्यात आलं होतं. आज संध्याकाळी त्यांची प्रकृती गंभीर असल्याचं वृत्त आलं. त्यानंतर त्यांच्यासाठी देशभरातून प्रार्थना सुरु होत्या. आयसीयूमध्ये त्यांच्यावर उपचार सुरु होते. काही वेळापूर्वी त्यांची प्राणज्योत मालवली.रतन टाटा यांच्यावर मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार सुरु होते. बुधवारी संध्याकाळी त्यांची प्रकृती बिघडली. काही वेळातच त्यांनी जगाचा निरोप घेतला.

### ‘तुम्ही कायम माझ्या हृदयात असाल’-मुकेश अंबानी

भारत आणि भारतीय उद्योगासाठी हा एक अतिशय दु:खाचा दिवस आहे. रतन टाटा यांचे निधन हे केवळ टाटा समूहाचेच नव्हे तर प्रत्येक भारतीयाचे मोठे नुकसान आहे.वैयक्तिक स्तरावर, रतन टाटा यांच्या निधनाने मला खूप दु:ख झाले आहे कारण मी एक प्रिय मित्र गमावला आहे. त्यांच्याशी झालेल्या माझ्या असंख्य संवादांपैकी प्रत्येकाने मला प्रेरणा दिली आणि उर्जा दिली आणि त्यांच्या चारित्र्याच्या खानदानीपणाबद्दल आणि त्यांनी साकारलेल्या उत्तम मानवी मूल्यांबद्दल माझा आदर वाढला.रतन टाटा हे एक दूरदर्शी उद्योगपती आणि परोपकारी होते, त्यांनी नेहमीच समाजाच्या हितासाठी झटले. रतन टाटा यांच्या निधनाने भारताने त्यांचा एक अत्यंत प्रतिष्ठित आणि दयाळू पुत्र गमावला आहे. टाटांनी भारताला जगासमोर नेले आणि जगातील सर्वोत्तम गोष्टी भारतात आणल्या. त्यांनी १९९१ साली अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून टाटा समूहाची वाढ ७० पटीने झाली आणि तो एक आंतरराष्ट्रीय ब्रँड झाला. रिलायन्स, नीता आणि अंबानी कुटुंबाच्या वतीने, मी टाटा कुटुंबातील आणि संपूर्ण टाटा समूहाच्या शोकाकुल सदस्यांना माझ्या संवेदना.

### रतन टाटांच्या निधनाने देशाने मानवता आणि दातृत्वाचा मानबिंदू हरपला, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

ज्येष्ठ उद्योगपती रतन टाटा यांच्या निधनाने अवघ्या देशाला मानवतेच्या श्रीमंतीची अनुभूती देणारे एक ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व आपल्यातून निघून गेले आहे. त्यांच्या निधनाने मानवतेचा, दातृत्त्वाचा, विश्वासार्हतेचा मानबिंदू हरपला आहे. रतन टाटा जी एक यशस्वी उद्योजक तर होतेच. पण, त्यापलिकडे ते देशाला ठावूक होते. कायम समाजाचा विचार, माणुसकी आणि विनम्रतेचे ते मूर्तिमंत होते. शिक्षण, ग्रामोन्नती आणि कुपोषण–आरोग्याच्या क्षेत्रात त्यांनी केलेले काम अतिशय उल्लेखनीय असेच आहे. देशाच्या आर्थिक विकासासोबतच मानवतेच्या विकासात त्यांनी लावलेला हातभार अत्यंत मोठा आहे. समाजातून कमावलेले समाजालाच परत केले पाहिजे, या श्रद्धेनेच ते कायम जगले. असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

### वय ६९ अन् टाटांची फायटर जेटमधून भरारी; उड्डाणानं इतिहास रचला अन् प्रत्येक भारतीय भारावला

मुंबई: प्रसिद्ध उद्योगपती रतन टाटा यांनी वयाच्या ८६ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. व्यवसाय करताना उच्च कोटीची नैतिक मूल्यं जपणारे, गरजूंना सढळ हस्ते मदत करणारे, देशाचा विचार आधी करणारे रतन टाटा भारतीयांच्या कायम स्मरणात राहतील. १९९१ ते २०१२ या कालावधीत त्यांनी टाटा समूहाचं चेअरमनपद भूषवलं. त्यांच्या नेतृत्वात टाटा समूहानं एक वेगळी उंची गाठली. माहिती तंत्रज्ञानाच्या युगाचा अचूक अंदाज बांधत त्यांनीच टीसीएस कंपनी सुरु केली. दूरदृष्टी असलेले उद्योगपती अशी त्यांची ओळख होती.






## ८६ व्या वर्षी प्राणज्योत मालवली

रतन टाटांच्या निधनानं देश शोकसागरात लोटला गेला आहे. टाटा रुग्णालयात गेले असल्याचं वृत्त सोमवारी आल्यानंतर अनेकांनी चिंता व्यक्त केली. अनेकांनी त्यांच्यासाठी प्रार्थना केल्या. आज संध्याकाळी त्यांची प्रकृती नाजूक असल्याचं वृत्त आलं होतं. त्यानंतरही देशभरातून प्रार्थना सुरु झाल्या. टाटांनी देशासाठी दिलेलं योगदान मोलाचं आहे. संवेदनशीलपणा कायम जपणारा, सढळ हस्तानं मदत करणारा उद्योगपती अशी रतन टाटांची ओळख होती. आयुष्यभर त्यांनी ती जपली. त्यांचा साधेपणा अनेकांसाठी कुतूहलाचा विषय राहिला. टाटा आयुष्यभर साधेपणानं जगले. टाटा समूहानं कोणताही उद्योग सुरु करताना आधी देशाचा विचार केला. देशाच्या गरजा लक्षात घेऊन त्यांनी अनेक उद्योग सुरु केले. समूहाची ही परंपरा टाटांनी कायम ठेवली. उच्च नैतिक मूल्य जपण्याचं काम त्यांनी केलं. संकटाच्या काळात त्यांनी देशाला कायम साथ दिली. कोणत्याही अडचणीत ते ठामपणे, निर्धारानं उभे राहिले. त्यामुळे ते देशाचे लाडके झाले. रतन टाटांचा जन्म २८ डिसेंबर १९३७ रोजी झाला. १९९१ ते २०१२ या कालावधीत ते टाटा समूहाचे चेअरमन राहिले. टाटा समूहाला वेगळ्या उंचीवर नेण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. काळाची पावलं ओळखून त्यांनी टीसीएस कंपनी सुरु केली. टाटा समूहाच्या एकूण महसुलात या कंपनीचा सिंहाचा वाटा आहे. टाटांनी दूरदृष्टी ठेवून घेतलेले निर्णय टाटा समूहासाठी फायदेशीर ठरले. समूहाची घोडदौड सुरु ठेवताना टाटांनी कायमच उच्च कोटीची नैतिक मूल्यं जपली.

२१ व्या शतकाची गरज ओळखून त्यांनी टाटा कन्सल्टन्सी कंपनी सुरु केली. भविष्यात माहिती–तंत्रज्ञानच सगळं काही असणार असल्याचं टाटांनी ओळखलं. हळूहळू टीसीएसचा विस्तार वाढत गेला. सध्याच्या घडीला टाटा समूहाच्या एकूण महसुलात टीसीएसचा सिंहाचा वाटा आहे. टीसीएसमुळे टाटा समूहाला अनेक नव्या क्षेत्रांमध्ये सहजपणे उतरता येतं, नवे प्रयोग करता येतात. टीसीएस देत असलेल्या महसुलातून या सगळ्या गोष्टी शक्य होतात. टाटांनी टीसीएस सुरु करताना दाखवलेल्या दूरदृष्टीचं नंतर भरभरुन कौतुक झालं.

### रतन टाटा विलक्षण माणूस होते, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी व्यक्त केला शोक

उद्योगपती व टाटा सन्सचे माजी चेअरमन रतन टाटा यांचं वयाच्या ८६ व्या वर्षी निधन झालं आहे. गेल्या काही दिवसांपासून त्यांची प्रकृती चिंताजनक होती. प्रकृती खालावल्यामुळे त्यांना आज मुंबईतील ब्रीच कॅन्डी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. मात्र, उपाचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. दरम्यान, रतन टाटांच्या निधनाचं वृत्त प्रसिद्ध होताच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला. रतन टाटा एक दूरदर्शी व्यापारी नेतृत्त्व, एक दयाळू व्यक्तीमत्त्व आणि एक विलक्षण माणूस होते. त्यांनी भारतातील सर्वात जुन्या आणि प्रतिष्ठित व्यावसायिक घराण्यांना स्थिर नेतृत्व दिले. त्यांचे योगदान बोर्डरूमच्या पलीकडे गेले. नम्रता, दयाळूपणा आणि आपल्या समाजाला अधिक चांगले बनविण्याच्या अतूट बांधिलकीमुळे ते लोकप्रिय ठरले. रतन टाटा यांच्या सर्वात अनोख्या पैलूंपैकी एक म्हणजे मोठी स्वप्ने पाहण्याची आवड. शिक्षण, आरोग्यसेवा, स्वच्छता, प्राणी कल्याण यासारख्या अनेक कारणांमध्ये ते आघाडीवर होते. रतन टाटा यांच्याशी झालेल्या असंख्य संवादांनी माझे मन भरून आले आहे. मी मुख्यमंत्री असताना त्यांना गुजरातमध्ये वारंवार भेटत असे. आम्ही विविध मुद्द्यांवर विचार विनिमय करत असू. मला त्यांचा दृष्टीकोन खूप समृद्ध वाटला. मी दिल्लीत आलो तेव्हाही हे संवाद सुरूच होते. त्यांच्या निधनाने अत्यंत दु:ख झाले आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

### देशाने दूरदर्शी आणि दयाळू मार्गदर्शक गमावला–नितीन गडकरी

देशाने एक गौरवशाली पुत्र गमावला आहे. रतन टाटा यांच्या निधनाचं वृत्त ऐकून मी स्तब्ध झालो आहे. रतन टाटा आणि मी आमचे तीस वर्षांपासूनचे खूप उत्तम संबंध होते. रतन टाटा यांच्या कौटुंबिक आयुष्यातही मी होतो, त्यांचा आणि माझा अनेक वर्षांचा स्नेह होता. मी त्यांची विनम्रता, त्यांचा साधेपणा सगळंच पाहिलं आहे. त्यांच्या आयुष्यात प्रामाणिकपणा आणि करुणा ही मूल्यं त्यांनी कायमच जपली. रतन टाटा हे अनेकांसाठी प्रेरणास्रोत होते. भारतातील अग्रगण्य उद्योजकांमध्ये त्यांचं नाव घेतलं जातं. देशाच्या अर्थव्यवस्थेत आणि रोजगार निर्मितीत त्यांनी मोलाचं योगदान दिलं.



# सत्ता आणि तरूणाई

**वयाची ६० ओलांडली की सेवानिवृत्त व्हावे हा शासकीय नियम आहे. जो नियम सरकारी कर्मचाऱ्यांना लागू आहे. तो राजकारणात सत्तेत असणाऱ्यांना का लागू करण्यात येऊ नये? या देशात लोकशाही आहे. कायदा सर्वांना सारखाच असायला हवा. राजकीय नेता असो वा शासकीय कर्मचारी कायद्यापुढे सर्व सारखेच. आपल्याकडे तरुण बेरोजगार आहे.हाताला काम नाही म्हणून ते दारोदार फिरतात आणि म्हातारे सत्तेला चिकटून राहतात असे विदारक चित्र बघायला मिळते. शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणेच राजकीय नेत्यांनीही वयाच्या ६० वर्षानंतर सत्तानिवृत्ती घ्यायला पाहिजे.**

भारत हा लोकशाही प्रधान देश आहे. जगातील सर्वात मोठा लोकशाहीप्रधान देश म्हणून भारताकडे बघितले जाते. लोककल्याणकारी राज्य व्यवस्था आपण स्विकारली आहे. लोकांचे, लोकांनी, लोकांसाठी चालविलेले राज्य म्हणजे लोकशाही. ही लोकशाहीची व्याख्या सर्वमान्य आहे. लोककल्याण आणि लोकहित ही संकल्पना गृहीत धरूनच लोकशाहीत राज्यकारभार चालविला जातो. कारभारी म्हणजे अर्थातच राज्यकर्ते हे लोकांमधून निवडणुकांच्या माध्यमातून निवडले जातात. लोकप्रतिनिधी या नावाने आपण त्यांना संबोधतो. मतपेटीतून निवडून आलेले हे लोकप्रिय लोकप्रतिनिधी दिल्लीपासून तर गल्लीपर्यंत सर्वसामान्य लोकांचे प्रातिनिधिक प्रतिनिधित्व करतात. खासदार, आमदार, महापौर, नगराध्यक्ष, नगरसेवक, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, विविध स्थानिक सहकारी संस्थांमध्ये हे लोकप्रतिनिधी सामान्य जनतेचे प्रतिनिधित्व करतात.

परंतु अनेकदा असे लक्षात येते की, या लोकांचे प्रतिनिधीत्व करताकरता या मंडळींचे वय वाढल्याने अनेकदा शारीरिक व मानसिक मर्यादा येतात. प्रकृती साथ देत नाही. शारीरिक फिटनेस नसल्यामुळे त्याचा विपरीत परिणाम लोकांच्या कामकाजावरही पडतो. तरीही मात्र हे लोकप्रतिनिधी पटकवलेली आपली खुर्ची सोडायला तयार नसते. लोकप्रियतेच्या नावाखाली वर्षानुवर्षे खुर्चीवर चिकटून बसण्यासाठी तळमळत असतात. त्यांची सत्तालालसा काही कमी होत नाही. जनतेने भरलेल्या विविध करावर सुखासीन जीवन जगत असतात. पैसा जनतेचा पण मजा हे मारत असतात. सत्तेच्या मोहापायी खुर्ची सोडायला त्यांचे मन धजत नाही. परिणामतः अनेक वयोवृद्ध लोकप्रतिनिधी म्हणून सत्तेत सहभागी असल्याचे आपण सतत बघत असतो.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये काही प्रमाणात हे प्रमाण कमी असले तरी देश आणि राज्य पातळीवर मात्र ही वयोवृद्ध मंडळी आपल्या खुर्च्या सोडायला तयार होत नाही. वयाची ७०-८० पार झाल्यावरही त्यांना खुर्चीचा मोह सोडवत नाही. ज्या वयात नातवंडांना घरी खेळवायचे त्या वयातही यांना समाजाची सेवा करायची असते. अनेकांच्या मुखात दात नसतात, स्मरणशक्ती साथ देत नाही. धडागतीचे स्वतः पायाने चालताही येत नाही. दुसऱ्यांच्या हातात हात देऊन चालावे लागते. तरीही समाजसेवेची आवड कमी होत नाही. शरीर साथ देत नसतानाही खुर्चीच्या मोहात गुंतून पडलेले असतात. लोकप्रियतेच्या नावाखाली नव्या दमाच्या कर्तुत्ववान पिढीला दाबून ठेवल्या जाते. त्यामुळे अनेकदा नवी आणि जुन्या पिढीत संघर्षाच्या ठिणग्या उडतात. उदाहरणच घ्यायचे असेल तर राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये चाललेला संघर्ष हे त्याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणता येईल.

नैसर्गिक नियमानुसार ज्येष्ठांनी वय झाल्यानंतर स्वमर्जीनेच आपली जागा खाली करून तरूणांना संधी द्यायला पाहिजे. परंतु दुर्दैवाने तसे होत नाही. अपवाद




वगळता अशी परिस्थिती जवळपास सर्वच राजकीय पक्षात आहे. नवयुवकांनाही वाटत आपणही काहीतरी कर्तृत्व सिद्ध केले पाहिजे. परंतु या त्यांच्या स्वप्नांना सिध्द करता येत नाही. त्यामुळे अनेकदा संघर्ष उडतो.

पाश्चिमात्य राष्ट्रात एकदा वय झाले की जेष्ठ मंडळी राजकारणातून निवृत्त होतात आणि तरुणांच्या हातात कारभार देतात. आपल्याकडे मात्र उलट आहे. वयोवृद्ध ज्येष्ठ मंडळी स्वतः पुढे राहतात आणि तरुणांना जबाबदाऱ्या द्यायला टाळतात. परिणामतः तरुणाईचा राजकारणाच्या माध्यमातून उपयोग करून घेता येत नाही. केवळ सतरंज्या उचलण्यासाठीच वयोवृद्ध तरुणांना राबवून घेतात असे एकंदरीत चित्र सगळीकडे बघायला मिळते.

आपल्या देशात सेवानिवृत्तीचा कायदा लागू आहे. शासकीय कर्मचारी वयाच्या ५८ ते ६० व्या वर्षी सेवानिवृत्त होतो. कारण शासकीय नियमानुसार या वयानंतर तो त्या कामात कार्यरत राहण्यास अपात्र असतो. त्यामुळे कर्मचाऱ्यांना सक्तीची सेवानिवृत्ती दिली जाते. वाढत्या वयाचे दुष्परिणाम जर कर्मचाऱ्यांना लावले जात असेल तर तेच निकष राजकीय नेत्यांना का लावू नये? शासकीय बाबुला वयाच्या ५८ व्या वर्षी सेवानिवृत्त करता आणि वयाची सत्तरीच्या वर पुढे वय गेलेले देशाचा कारभार चालविणार. हा नैसर्गिक न्याय नाही. ज्यांच्या कार्यक्षमता आहे त्यांना सतरंज्या उचलायला लावायचे आणि आपण स्वतः सत्ता भोगायची हा दोगलेपणा आहे. कुठेतरी हे थांबायला पाहिजे. ज्याप्रमाणे शासकीय बाबुला विशिष्ट वयामध्ये सेवानिवृत्त केले जाते. तसेच या लोकप्रतिनिधींनासुद्धा सेवानिवृत्ती वयाच्या बंधनाचा लगाम कसायलाच पाहिजे अशी भावना तरूणाईच्या मनात आहे.

नव्या दमाच्या, नव्या स्वप्नांच्या नवतरुणाईला सत्तेत सहभागी होऊन काहीतरी करण्याची संधी मिळेल. नवतरुण हे स्वप्नाळू असतात. त्यांना त्यांच्या स्वप्नातील जग प्रत्यक्षात साकारायचे असते. त्यासाठी राजकारणात काम करणाऱ्या तरुणांना सत्तेत सहभागी होण्याची संधी मिळाली पाहिजे. जे राज्यकर्ते राजकारणी वयाने ज्येष्ठ आहे. जेष्ठांनी तरुणांना मार्गदर्शन करावे. दबाव ठेवावा हे स्वागतार्ह आहे. आपल्याकडे मात्र चित्र वेगळे आहे. ज्यांच्यात काहीतरी करून दाखविण्याची क्षमता आहे ते बेरोजगार म्हणून दारोदार भटकतात. आणि ज्यांना घरी आराम करायला पाहिजे हे सत्तेला चिपकून बसतात. असे म्हणतात की, जोवर मुले वयाने लहान असतात. तोवर त्यांचे लाड करावे. पण जेव्हा बापाचे आणि मुलाचे जोडे सारख्याच मापाचे होतात. तेव्हा बापाने मुलाला आपला मित्र वा सहकारी मानून अधिकार प्रदान करायला स्वतःहूनच पुढे आलं पाहिजे. त्यामुळे नवीन आणि जुन्या पिढीत संघर्ष होणार नाही. तरुणांना संधी मिळाली तर निश्चितच सत्तेत तरूणाईचा सहभाग वाढेल. त्याचा लोकशाहीला फायदा होईल. ज्येष्ठांचे मार्गदर्शन आणि तरूणाईचा सहभाग यातून निश्चितच लोकशाही सुदृढ होईल. लोककल्याणकारी योजना अंमलात येईल.

# बदलापूर बस स्थानकाची दुरावस्था

**बदलापूर | प्रतिनिधी**

बदलापूर हे मुख्य बाजारपेठ असल्याने, बदलापूर परिसरातील खेड्या-पाड्यातील नागरिक दररोज येथे येत असतात, आणि त्यांच्यासाठी मुख्य वाहतूक साधन म्हणजे बस (लालपरी). मात्र, याच लालपरीच्या बदलापूर बस स्थानकाची दुरावस्था चिंताजनक आहे.

बदलापूर पश्चिमेकडील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे बस स्थानक आहे. येथून बदलापूर ते मुरबाड, बदलापूर ते टिटवाळा, बोराडपाडा रोड, तसेच बदलापूर ते चोपडा या लांब पल्ल्यासाठी बस सुटतात. कमी बस उपलब्धतेमुळे प्रवाशांना बस सुटण्याच्या वेळेआधीच स्थानकावर येऊन थांबावे लागते. मात्र, बस स्थानकावर बसण्यासाठी योग्य आसनाची सुविधा नसल्यामुळे प्रवाशांना उभे राहूनच बसची वाट पहावी लागते.

बदलापूर परिसरातील खेड्या-पाड्यातून बसने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी आहे. यामध्ये शालेय विद्यार्थी, महिला आणि वरिष्ठ नागरिकांचा समावेश आहे. रस्त्यांची खराब स्थिती व बस स्थानकाची दुरावस्था यामुळे प्रवाशांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.

**शौचालयाची दुरावस्था**

बदलापूर बस स्थानकावरील शौचालय दुर्गंधयुक्त आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या



शौचालयाची साफसफाई केली गेली नाही. पाण्याचीही कोणतीही व्यवस्था नाही, ज्यामुळे महिलांना मोठा त्रास सहन करावा लागतो. या शौचालयाच्या आसपास डुकरांच्या वावरामुळे महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

**बस स्थानकाला गलती**

बदलापूर बस स्थानकाच्या छपराला गलती लागली आहे. पाऊस सुरू झाला की प्रवाशांना छत्री घेऊन बसची वाट पहावी लागते. याशिवाय, या स्थानकाला पंखे व वीज नाहीत, तसेच अपुरे कर्मचारी यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत.

**पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही**

बदलापूर बस स्थानकावर पिण्याच्या पाण्याची कोणतीही व्यवस्था नाही. यामुळे प्रवाशांना खाजगी दुकानांमधून पाण्याची खरेदी करावी लागते.

**खाजगी वाहनांची पार्किंग**

बदलापूर बस स्थानकाच्या जागेत अनेक खासगी वाहनांनी कब्जा केला आहे. अनधिकृतपणे आपल्या गाड्या पार्किंग केल्या जात आहेत. राज्य मार्ग परिवहन महामंडळ मात्र याकडे दुर्लक्ष करत आहे.

या समस्यांमुळे बदलापूर बस स्थानकाची स्थिती अत्यंत गंभीर आहे. तरीही, राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून बस प्रवाशांना आवश्यक सुविधांची पुरवठा करणे बंधनकारक आहे. लवकरात लवकर महामंडळाने बदलापूर बस स्थानकाच्या समस्या सोडवाव्यात, अशी बदलापूरकरांची अपेक्षा आहे.

# विहीरगाव येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसराच्या सौंदर्यीकरणाची मागणी जोरात

**मुल | प्रतिनिधी**

वॉर्ड क्रमांक १६, विहीरगाव येथे उभा असलेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा समाजात समता, न्याय, आणि बंधुता यांचे प्रतीक आहे. या ऐतिहासिक ठिकाणाचा व समाजासाठी प्रेरणादायी असलेल्या पुतळा परिसराचा सर्वांगीण विकास आणि सौंदर्यीकरण तातडीने करण्यात यावे, अशी मागणी नवयुवक बौद्ध मंडळ विहीरगाव आणि स्थानिक समाजबांधवांनी केली आहे.



नुकतीच नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांना सादर करण्यात आलेल्या निवेदनात, डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या या स्थळाचे सौंदर्यीकरण करण्यात यावे आणि नागरिकांसाठी ते प्रेरणादायी जागा बनवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पुतळ्याभोवतीचा परिसर सुशोभित झाल्यास येणाऱ्या भाविकांसाठी आदर्श ठिकाण तयार होईल आणि तरुण पिढीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार अधिक सखोलपणे समजून घेण्यासाठी प्रेरणा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.समाजातील नागरिकांनी जय भीम, जय संविधान च्या घोषवाक्याने सजलेले निवेदन सादर करून प्रशासनाने त्वरित सकारात्मक प्रतिसाद देऊन सौंदर्यीकरणाची कामे हाती घ्यावीत, अशी मागणी केली आहे. विहीरगावमधील समाज बांधवांची ही मागणी समाजाच्या भावनांचा आदर करीत प्रशासनाने लवकरात लवकर पूर्ण करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# मुलाशी काय भिडता? बापाशी भिडा-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**मुंबई | वृत्तसंस्था**

विधानसभेची निवडणूक तोंडावर आल्यामुळे अनेक राजकीय घडामोडींना वेग आला आहे. राज्यभरात सध्या ठिकठिकाणी सभा आणि मेळावे सुरु असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. एकीकडे महायुती तर दुसरीकडे महाविकास आघाडी अशा राज्यभरात सभा सुरु आहेत. त्याचबरोबर विविध मतदारसंघात निवडणुकीची रणनीती आखली जात आहे. पक्ष संघटनेचा आढावा नेत्यांकडून घेतला जात आहे. यातच काही पदाधिकारी एका पक्षातून दुसऱ्या पक्षात प्रवेश करत असल्याचंही दिसून येत आहे. या अनुषंगाने आज शिवसेना (शिंदे) युवासेनेचे नेते तथा कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे माजी स्थायी सभापती दिपेश म्हात्रे यांनी त्यांच्या शेकडो कार्यकर्त्यांसह शिवसेनेत (ठाकरे) प्रवेश केला. त्यामुळे कल्याण-डोंबिवलीत शिवसेनेला (शिंदे) धक्का बसला.दरम्यान, दिपेश म्हात्रे यांच्या पक्ष प्रवेशावेळी उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह खासदार श्रीकांत शिंदे यांच्यावर हल्लाबोल केला. मात्र, यावेळी उद्धव ठाकरे यांनी खासदार श्रीकांत शिंदेंचा कार्ट असा उल्लेख केला.

# मुक्त व पारदर्शक निवडणुकीसाठी आंतरराज्यीय समन्वय उत्तम ठेवा-आय.जी.दिलीप पाटील भुजबळ

## चंद्रपूरात अधिकाऱ्यांची आंतरराज्यीय समन्वय बैठक

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

आगामी काळात महाराष्ट्र विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक होणार आहे. विदर्भातील चंद्रपूर, यवतमाळ, गडचिरोली या जिल्ह्यांची सीमा तेलंगणा राज्याला लागून आहे. त्यामुळे विधानसभेच्या निवडणुका मुक्त वातावरणात तसेच पारदर्शक पध्दतीने पार पाडण्यासाठी संबंधित जिल्ह्यातील अधिका-यांनी आंतरराज्यीय समन्वय उत्तम ठेवावा, अशा सुचना नागपूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक डॉ. दिलीप पाटील भुजबळ यांनी दिल्या.



वन अकादमी येथे आज (दि.९) चंद्रपूर, यवतमाळ, गडचिरोली तसेच तेलंगणा राज्यातील आदिलाबाद आणि आसिफाबाद या जिल्ह्यातील वरिष्ठ अधिका-यांची आंतरराज्यीय समन्वय बैठक पार पडली. यावेळी श्री. भुजबळ बोलत होते. बैठकीला चंद्रपूरचे जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., यवतमाळचे जिल्हाधिकारी पंकज आशिया, आसिफाबादचे अतिरिक्त पोलिस अधिक्षक आर. प्रभाकर राव, आदिलाबादचे विशेष शाखेचे पोलिस अधिक्षक श्रीनिवास पोथारम, गडचिरोलीचे पोलिस उपअधिक्षक (अभियान) विशाल नागरगोजे, चंद्रपूरचे उपजिल्हाधिकारी (निवडणूक) सुभाष चौधरी आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सहा महिन्यांपूर्वीच लोकसभेच्या निवडणुका पार पडल्या, असे सांगून विशेष पोलिस महानिरीक्षक डॉ. दिलीप पाटील भुजबळ म्हणाले, निवडणुकीच्या काळात अवैध रक्कमेची ने-आण, अवैध दारू वाहतूक तसेच अंमली पदार्थ तस्करी आदी बाबी रोखण्यासाठी आंतरराज्यीय अधिका-यांमध्ये उत्तम समन्वय असणे गरजेचे आहे. आगामी महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका मुक्त आणि पारदर्शक पध्दतीने पार पाडण्यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. चंद्रपूर जिल्ह्यात तेलंगणाच्या सीमेवर ६ बॉर्डर चेक पोस्ट आहेत. या ठिकाणी तसेच इतरही सीमेवरील क्षेत्रात एस.एस.टी., व्ही.एस.टी. टीमचे तात्काळ गठण करावे. सोबतच महसूल विभाग, राज्य उत्पादन शुल्क विभाग, वनविभाग आणि पोलिस विभागाने सुद्धा दक्ष असावे.

आंतरराज्यीय वरिष्ठ अधिका-यांसोबत वैयक्तिक भेट घ्या :आंतरराज्यीय वरिष्ठ अधिका-यांनी एकमेकांचे नाव, संपर्क क्रमांक तसेच सीमेवर असलेल्या चेक पोस्टवरील अधिका-यांची नावे आणि मोबाईल क्रमांक एकमेकांस शेअर करावेत. सीमेवरील चेक पोस्ट वर अधिका-यांची योग्य ड्यूटी लावावी. आंतरराज्यीय अधिका-यांनी उत्तम समन्वय आणि संपर्क ठेवावा. आसिफाबाद आणि आदिलाबादच्या वरिष्ठ अधिका-यांसोबत चंद्रपूर, यवतमाळ आणि गडचिरोली जिल्हा प्रशासनाच्या वरिष्ठ अधिका-यांनी वैयक्तिक भेट घ्यावी.

गुन्हेगारांवर कडक कारवाई करा :निवडणुकीत कोणताही अनुचित प्रकार होऊ नये, यासाठी गुन्हेगारांची यादी करून त्यांच्यावर तसेच गो - तस्करी, धार्मिक भावना भडकविणारे असामाजिक तत्व आदी गुन्हेगारांवर कडक कारवाई करावी. निवडणुकीच्या काळात अवैधरित्या रक्कम, दारू आदींची देवाण-घेवाण होण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्यामुळे अवैध वाहतुकीचे मार्ग, पुरवठादार व साठवणूदार यांच्यावर कारवाई करावी. बॉर्डर चेक पोस्टवर सीसीटीव्ही, वायरलेस इत्यादी साहित्य पुरवठा करावा. कोणत्याही परिस्थितीत आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची काळजी घ्यावी, अशा सुचना विशेष पोलिस महानिरीक्षक डॉ. दिलीप पाटील भुजबळ यांनी दिल्या.


जिल्हाधिका-यांनी केले सादरीकरण :यावेळी सादरीकरण करतांना जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. म्हणाले, चंद्रपूर जिल्ह्यात सहा विधानसभा मतदार संघ असून जिल्ह्यातील राजूरा विधानसभा मतदारसंघाची सीमा तेलंगणातील आदिलाबाद आणि आसिफाबाद या जिल्ह्यांना लागून आहे. तेलंगणाच्या सीमेवर ६ चेक पोस्ट लावण्यात आले आहेत. तर पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन म्हणाले, दोन्ही जिल्ह्यात उत्तम समन्वय असून एकमेकांना माहितीचे आदान-प्रदान करण्यात येते. यावेळी यवतमाळ, गडचिरोली, आसिफाबाद आणि आदिलाबाद येथील अधिका-यांनीसुध्दा सादरीकरण केले.

बैठकीला चंद्रपूरचे सहाय्यक जिल्हाधिकारी कश्मिरा संख्ये यांच्यासह वरिष्ठ पोलिस अधिकारी, महसूल अधिकारी, वन अधिकारी, राज्य उत्पादन शुल्क अधिकारी, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# शपथेवर बोलणे महाग, शंभर रुपयांचा स्टॅम्प झाला पाचशेचा

**किल्ले धारूर | प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकांना डोळ्यासमोर ठेवून अभद्र महा युती सरकारने एकीकडे मोफत योजनांची खैरात सुरू केली आहे, तर दुसरीकडे विविध गोष्टींच्या भावांमध्ये वाढ करून वसूलीचा प्रकार चालू केला आहे, हे सुज्ञ जनतेला दिसत आहे, असे लक्षात आणून दिले प्रा. ईश्वर आनंदराव मुंडे यांनी.



प्रा. मुंडे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे टिका केली की, मोफत योजनांच्या बाबतीत एक हाताने द्यायचे आणि दुसऱ्या हाताने परत घ्यायचे हेच सत्य आहे. त्यांनी म्हटले की, राज्य दिवाळखोरीत असताना ठोस उत्पन्नाची तरतूद नसतानाही फक्त मतांवर लक्ष केंद्रित करून रिन काढणे योग्य नाही. जनकल्याणाच्या योजनांचा उद्देश शेवटच्या घटकाचा सर्वांगीण विकास करणे असावा लागतो. यासाठी योजना कायमस्वरूपी असाव्यात लागतात आणि त्यासाठी लागणाऱ्या पैशांची कायमस्वरूपी उत्पन्नाची तरतूद करणे आवश्यक आहे. जीवनावश्यक वस्तूंचे भाव वाढवून मोफत योजनांची खैरात करणे हे योग्य नाही.

शेतीमालाला योग्य भाव न देता तो कमी करणे, दूधाला भाव वाढ न देणे, जनावरांचे खाद्य व जीवनावश्यक वस्तूंचे भाव वाढवणे यासारख्या गोष्टींवर त्यांनी टीका केली. त्यांनी म्हटले की, मद्यपेयांचे भाव वाढवून पैशांची वसूली करणे हे जनता उघड्या डोळ्यांनी पाहत आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी, त्यांच्या पतींना सन्मानाचा रोजगार आणि मुलांना मोफत व दर्जेदार शिक्षण मिळावे, असे त्यांनी स्पष्ट केले. परंतु शाळा बंद करणे आणि कंत्राटी शिक्षकांची भरती करणे योग्य नाही, असे ते म्हणाले. निवडणुकीत लाडक्या बहीणी लाडक्या भाऊजींना किंवा भाच्याला विचारूनच मतदान करतात, असेही प्रा. मुंडे यांनी स्पष्ट केले.प्रा. ईश्वर मुंडे यांच्या या टीकेत सरकारच्या धोरणांवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत, ज्यामुळे आगामी निवडणुकांमध्ये मतदारांना विचार करण्यास भाग पडेल.

# अनुसूचित जातीच्या नवउद्योजक तरुणांसाठी 'स्टँडअप इंडिया'मार्जिन मनीयोजना

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या 'स्टँडअप इंडिया' योजनेंतर्गत महाराष्ट्राती अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील सवलतीस पात्र नवउद्योजक तरुणांना मार्जीन मनी उपलब्ध करूनदेण्याचीयोजना समाजकल्याण विभागामार्फत राबविण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यातील अनुसचित जाती,वनवबौध्द प्रवर्गातील सवलतीस पात्र१८वर्षावरील नवउद्योजक तरुणांनी१०टक्के स्व:हिस्सा भरणा केल्यानंतर व बँकेने अर्जदारास'स्टँडअप इंडिया'योजनेंतर्गत७५टक्के कर्ज मंजूर केल्यानंतर उर्वरित फ्रंट एंड सबसिडी अनुषंगाने नवउद्योजकांना प्रकल्प मूल्याच्या१५टक्के हिस्सा अनुदान राज्य शासनामार्फत देण्यात येईल. सदर योजनेच्या मार्गदर्शक सूचना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,शासन निर्णय८मार्च,२०१९ व९ डिसेंबर २०२०अन्वये शासन स्तरावरुन निश्चीत करण्यात आल्या आहेत. सदरचा शासन निर्णय शासनाच्य mwww.maharashtragov.in संकेतस्थळावर निरीक्षणासाठी उपलब्ध आहे. जिल्ह्यातील पात्र इच्छुक नवउद्योजक तरुणांनी सहायक आयुक्त,समाज कल्याण कार्यालय,चंद्रपूरयेथेसंपर्क साधावा व सदर योजनेचा लाभ घ्यावा,असे आवाहन सहाय्यक आयुक्त यांनी केले आहे.

# आमदार किसन कथोरे यांच्या हस्ते विविध विकास कामांचे भूमिपूजन

**बदलापूर । प्रतिनिधी**

आचारसंहिता लागू होण्याआधी आमदार किसन कथोरे यांनी मुरबाड मतदारसंघातील विविध विकास कामांचे भूमिपूजन करण्यास प्रारंभ केला आहे. त्यांच्या काम करण्याच्या शैलीमुळे आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे मुरबाड मतदारसंघात त्यांना जनतेचा भरभरून पाठिंबा मिळत आहे.

गेल्या काही वर्षांपासून चर्चेत असलेल्या मुरबाड-बारवी धरण रस्त्याचे काँक्रिटीकरण हा प्रमुख प्रकल्प असून पावसाळ्यात खड्ड्यांमुळे प्रवाशांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असे. आमदार किसन कथोरे यांच्या प्रयत्नांमुळे या रस्त्याच्या सिमेंट काँक्रिटीकरणासाठी शंभर कोटी रुपयांचा निधी राज्य सरकारकडून मंजूर झाला आहे. हायब्रिड ॲन्यूईटी अंतर्गत या रस्त्याचे काँक्रिटीकरणाचे काम दसऱ्यानंतर सुरू होणार आहे, आणि ते सहा महिन्यांत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. या रस्त्यामुळे परिसरातील दळणवळण अधिक सुलभ होणार असून तालुक्याच्या विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास आमदार कथोरे यांनी व्यक्त केला. मुरबाड आणि बदलापूरमधील नागरिकांमध्ये या निर्णयामुळे आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून त्यांनी आमदारांचे आभार मानले आहेत.तसेच, आमदार किसन कथोरे यांच्या प्रयत्नांमुळे मुरबाड बसस्थानकाच्या नूतनीकरणासाठी १३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यामुळे बसस्थानकाचे अत्याधुनिक मॉडेल तयार केले जाणार असून ते महाराष्ट्रातील इतर ठिकाणी प्रसिद्ध होईल, असे त्यांनी सांगितले. बसस्थानकाच्या बाजूला असलेल्या एसटी महामंडळाच्या जागेचा वापर व्यावसायिक दृष्टिकोनातून करण्याची योजना आखण्यात आली आहे, ज्यामुळे एसटीला उत्पन्न मिळेल आणि नागरिकांनाही सुविधा मिळतील. आमदार कथोरे यांनी मुरबाडमध्ये इलेक्ट्रिक बस आणण्याचा मानसही व्यक्त केला आहे. आता मुरबाडच्या आदिवासी बांधवांनाही एसी बसने परवडणारा प्रवास करण्याची संधी मिळणार आहे. शिवाय, मुरबाडच्या पाणीप्रश्नाचा कायमस्वरूपी सोडवणुकीसाठी ३२ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून त्यांनी मुरबाडकरांना दिलासा दिला आहे.रविवारी, आमदार कथोरे यांच्या पाठपुराव्याने बदलापूर नगरपरिषद क्षेत्रातील जुवेली-खरवई, यादव नगर, कात्रज, म्हाडा कॉलनी, बेलवली, दत्त चौक या प्रमुख रस्त्यांच्या सिमेंट काँक्रिटीकरणाचे भूमिपूजन करण्यात आले. डांबरमुक्त बदलापूर करण्याचा मानस व्यक्त करत, त्यांनी नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या आणि त्यावर तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. या विविध विकासकामांमुळे मुरबाड मतदारसंघात उत्साहाचे वातावरण आहे.



# दारू तस्करीसाठी तरुणांची अनोखी शक्कल ;एक चुकीने डाव फसला



**गडचिरोली । प्रतिनिधी**

दारूबंदी असलेल्या गडचिरोली जिल्ह्यात बाहेरच्या जिल्ह्यातून दारू तस्करी करण्यासाठी तरुणांनी विविध युक्त्या वापरल्या आहेत. ६ ऑक्टोबर रोजी रात्री मुलचेरा पोलिसांनी गस्त घालत असताना तब्बल १० लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यामध्ये आकाश भाऊराव भरडकर (२५ वर्ष), संदीप नरेश कोलते (३१ वर्ष) आणि संदीप रघुनाथ ठाकरे (३५ वर्ष) या तीन आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

६ ऑक्टोबरच्या रात्री मुलचेरा पोलिस गस्त घेत असताना आष्टीहून मुलचेरा मार्गे आलापल्लीकडे जाणाऱ्या एक अशोका लेलँड कंपनीच्या बडा दोस्त वाहनास थांबवले. या वाहनात पॉपकॉर्न भरलेल्या १८ नग प्लास्टिक पोत्या आढळल्या. मात्र, वाहनातील व्यक्तींची संशयास्पद हालचाल पाहून पोलिसांनी त्याची तपासणी केली. वाहनाच्या मागील भागात वेल्डिंग केलेले आढळल्याने पोलिसांना शंका आली. वाहनाच्या आत कप्पे तयार असल्याचे आढळल्यानंतर, त्यात अवैध दारू असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी ३ लाख ८५ हजार रुपये किमतीच्या ८४ बॉक्स अवैध दारू आणि ७ लाख रुपये किमतीचे वाहन जप्त केले, एकूण मुद्देमाल १० लाख ८५ हजार २०० रुपयांचा आहे.

**कुठल्याही अवैध व्यवसायात गुंतू नये. अवैध दारू विक्री किंवा वाहतूक करताना आढळल्यास कठोर कारवाई करण्यात येईल. मुलचेरात अवैध व्यवसायाला थारा देणार नाही, असे महेश विधाते, पोलिस निरीक्षक मुलचेरा यांनी सांगितले.**

**या कारवाईत पोलिस अधीक्षक निलोत्पल, अप्पर पोलिस अधीक्षक (अभियान) यतीश देशमुख, अप्पर पोलिस अधीक्षक (प्रशासन) एम रमेश, उपविभागीय पोलीस अधीक्षक अजय कोकाटे यांच्या मार्गदर्शनात मुलचेराचे ठाणेदार महेश विधाते यांनी महत्त्वाची भूमिका घेतली.**

**या घटनेत, वाहनामध्ये ज्वारीचे पॉपकॉर्न वाहतूक होत असताना मागच्या पल्ल्याच्या जागी वेल्डिंग झालेलं असल्यामुळे पोलिसांना संशय आला. या संशयास्पद हालचालींमुळे ज्वारीचे पॉपकॉर्न भरणाऱ्या पोत्यांची तपासणी करताच दारू वाहतूक करणाऱ्यांचा डाव फसला.**

## सह्याद्रीचा राखणदार मातेच्या दारी

# नाचणगावचे श्री सटवाई माता देवस्थान:एक ऐतिहासिक व धार्मिक केंद्र




**पुलगाव । प्रतिनिधी**

नाचणगाव येथे स्थित श्री सटवाई माता देवस्थानचा इतिहास मागील दोन ते तीन पिढ्यांचा आहे. सुरुवातीच्या काळात ही देवी शेताच्या बांधावरील कुंपणात वास करत होती. परंतु काही वर्षांपूर्वी, नाचणगाव येथील गजानन मसराम यांना स्वप्नात देवीच्या दर्शनामुळे मंदिराचे बांधकाम करण्याचा संदेश मिळाला.

त्यांच्या पुढाकाराने आणि लोकवर्गणीतून मंदिराचे सुंदर निर्माण झाले, जे आज बिरे यांचे शेताच्या बांधावर उभे आहे. नवरात्र उत्सवाच्या काळात येथे पाच हजारांच्या वर भाविक महाप्रसादासाठी एकत्र येतात. श्री सटवाई माता देवस्थानवर दूरदूरच्या भाविकांचे दर्शनासाठी येणे जाणे सुरू असते, तर पुलगाव आणि नाचणगाव परिसरातील लोक मंदिराच्या ठिकाणी वनभोजनासाठी येतात. तथापि, मंदिरापर्यंत रस्त्याची व्यवस्था नसल्यामुळे भाविकांना ये-जा करण्यास त्रास सहन करावा लागतो. मंदिराचे बांधकाम मागील सात वर्षांपूर्वी झाले होते, परंतु आजही रस्त्याच्या अभावामुळे येणाऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

# आ.जोरगेवार यांच्या मागणीला ऐतिहासिक यश १६ बुद्धविहारांमध्ये तयार होणार १६ अभ्यासिका

## जिथे बुद्ध विहार,तिथे अभ्यासिका या संकल्पपूर्तीकडे यशस्वी पाऊल

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आमदार किशोर जोरगेवार यांच्या मागणीला ऐतिहासिक यश आले असून मतदारसंघातील१६बुद्धविहार येथे१६अभ्यासिकांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय विभागाच्या वतीने५कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. एका वेळी१६अभ्यासिकांसाठी निधी मंजूर करणारे चंद्रपूर हे राज्यातील पहिले मतदारसंघ ठरले आहे.

शिका,संघटित व्हा आणि संघर्ष करा हा नारा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिला होता. मात्र आजची महागडी शिक्षण व्यवस्था लक्षात घेता सर्वसामान्य विद्यार्थ्यांसाठी शिक्षण घेणे कठीण झाले आहे. त्यामुळे मतदारसंघात शासकीय अभ्यासिकांचे जाळे तयार करण्याचा संकल्प आमदार किशोर जोरगेवार यांनी केला होता. यासाठी त्यांनी



शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा केला. यात त्यांना यशही आले असून आजघडीला शहरात जवळपास९अभ्यासिकांचे काम प्रगतीपथावर आहे,तर सहा अभ्यासिका सुरू करण्यात आल्या आहेत.दरम्यान, बुद्धविहारांमध्ये अभ्यासिका तयार करण्याची मागणी समाज बांधवांच्या वतीने करण्यात आली होती. त्यानंतर जिथे बुद्धविहार,तिथे अभ्यासिका असा संकल्प आमदार किशोर जोरगेवार यांनी केला होता. यासाठी त्यांचा सातत्याने पाठपुरावा सुरू होता. अखेर त्यांच्या या पाठपुराव्याला यश आले असून मतदारसंघातील१६अभ्यासिकांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय विभागाच्या वतीने५कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. लवकरच या कामाला सुरुवात होणार आहे.चंद्रपूरात अभ्यासिकांचे जाळे तयार करण्याचा संकल्प आपला होता आणि यात मोठे यश मिळाल्याचे त्यांनी सांगितले. शांतीचा संदेश देणाऱ्या बुद्ध विहारांमध्ये आज अभ्यासिकांसाठी मोठा निधी देता आल्याचे समाधान आहे. हे काम येथेच थांबणार नसून पुढेही आणखी बुद्धविहारांना आपण निधी देणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

# सायबर भामट्यांकडून १८.७८ लाखांची फसवणूक ग्रामीण सायबर पोलिसांनी जलद कारवाईने रक्कम गोठवली

**बिडकीन । आझाद शेख**

बिडकीन येथील एका कंपनीला सायबर भामट्याने बनावट ई-मेल पाठवून १८,७८,१११ रुपये फसवले. कंपनीने कच्चा मालाच्या खरेदीसाठी संबंधित व्हेन्डरच्या नावाने आलेल्या ई-मेलमध्ये दिलेल्या नव्या बँक खात्यावर रक्कम जमा केली. मात्र, नंतर ही फसवणूक असल्याचे लक्षात आल्यावर कंपनीने तात्काळ ग्रामीण सायबर पोलिसांकडे तक्रार दाखल केली.

पोलिस निरीक्षक सत्यजीत ताईतवाले यांच्या नेतृत्वाखाली सायबर पोलिसांनी तात्काळ तपास सुरू करून कंपनीने रक्कम पाठविलेल्या बँक खात्याचा तपशील मिळवला. नोडल अधिकारी आणि बँक ऑफ बडोदा यांच्या सहयोगाने तात्काळ संपर्क साधून रक्कम गोठवण्यात यश मिळविले. पोलिसांच्या तत्परतेमुळे सायबर भामट्यांना रक्कम काढणे शक्य झाले नाही आणि तक्रारदार कंपनीचे नुकसान टळले.गेल्या तीन महिन्यांत सायबर पोलिसांनी १७ फसवणूक




प्रकरणांत ४१,१८,८४७ रुपये गोठवले आहेत, ज्यापैकी ३८,९९,९७९ रुपये फसवणूक झालेल्या नागरिकांना परत करण्यात आले आहेत. सायबर फसवणूक झाल्यास नागरिकांनी १९३० टोल फ्री क्रमांकावर किंवा लूलशीलीळाश.र्सीं.ळप या संकेतस्थळावर तात्काळ तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, अपर पोलीस अधीक्षक सुनिल कृष्णा लांजेवार यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली. यामध्ये सायबर पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सत्यजीत ताईतवाले, सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदिश राऊत, पोलीस उपनिरीक्षक संतोष मरळ, पोलीस अमलदार कैलास कामठे, संदीप वरपे, नितीन जाधव, गणेश घोरपडे, मुकेश वाघ, सविता जायभाये, रुपाली ढोले, शितल खंडागळे यांनी सहभाग घेतला

## अंध विद्यार्थ्यांमधून घडावेत बालकवी

# प्रसिद्ध साहित्यिक एकनाथ आव्हाड यांचे मार्गदर्शन

**वरोरा । प्रतिनिधी**

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यानंतर, प्रसिद्ध साहित्यिक एकनाथ आव्हाड यांची प्रथमच आनंदवनाला भेट झाली. त्यांनी ज्येष्ठ समाजसेवक डॉ. विकास आमटे आणि पल्लवी आमटे यांची भेट घेऊन आनंदवनातील विविध प्रकल्पांची माहिती घेतली. यावेळी राजेश ताजने यांनी 'आनंदवनाचा विकास' हे पुस्तक त्यांना भेट दिले.

यानंतर, एकनाथ आव्हाड यांनी आनंद अंध विद्यालयातील विद्यार्थ्यांना भेटून त्यांच्यासाठी काव्य कार्यक्रम सादर केला. त्यांनी अंध विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बालकवी घडविण्याची अपेक्षा व्यक्त केली. आव्हाड म्हणाले, प्राथमिक शिक्षणाच्या






स्तरावरच विद्यार्थ्यांना भाषेची गोडी लागली तरच भाषेचा विकास होऊ शकतो. त्यांनी अंध विद्यार्थ्यांसमोर 'कावळा शेवया खातो' ही कविता सादर करून विद्यार्थ्यांचे मन जिंकले.कार्यक्रमात डॉ. प्रा. प्रमोद नारायणे यांनी 'प्राण्यांची पार्टी' व 'कार ड्रायव्हिंग' या कविता विनोदात्मक शैलीत सादर केल्या, ज्यामुळे सर्व विद्यार्थ्यांनी टाळ्यांचा गजर करत सभागृहात उत्साह निर्माण केला. या कार्यक्रमाला ग्रंथाली प्रकाशनाचे विश्वस्त मुकेश हिंगलासपूकर, जे. जे. स्कूल ऑफ आर्टचे चित्रकार पुंडलिक वझे, ज्येष्ठ कवयित्री ज्योती कपिले, श्रीकांत पेटकर आणि कल्याण किशोर पेटकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आचार्य परमानंद तिराणिक यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक सेवकराम बांगडकर, विशेष शिक्षिका वर्षा उईके, तनुजा सव्वाशेरे आणि शालेय मंत्रिमंडळातील विद्यार्थी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# मातोश्री वृद्धाश्रमाचे कार्य कौतुकास्पद-संजय घोलप



**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील शहरापासून अवघ्या दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या मातोश्री वृद्धाश्रमाचे कार्य अनाथ आणि गरीब व्यक्तींना दिलासा देण्यासाठी महत्वाचे योगदान देत आहे, असे प्रतिपादन मनसेचे अध्यक्ष संजय बापू घोलप यांनी केले.

सेवानिवृत्त शिक्षक बाळासाहेब गोरे यांनी वृद्धाश्रमाची स्थापना करून वृद्ध व्यक्तींना मानसन्मान मिळवून देण्यासाठी कष्ट आणि घामाचे पैसे इतरत्र खर्च करण्याऐवजी यामध्ये गुंतवले आहेत. या वृद्धाश्रमाची स्थापना केल्यामुळे मला खूप समाधान मिळते, असे गोरे यांनी सांगितले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते शहाजी ठोसर, माजी पोलिस पाटील मोटे, आणि अन्य प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

# डॉ.अविनाश (अनाहत) जोशी: परंपरेच्या स्पर्शातून जीवनाला नवीन दिशा देणारे युवा उद्योजक



**कन्नड । आबाराव खैरे**

डॉ. अविनाश (अनाहत) गुलाबजी जोशी, हे नाव आज महाराष्ट्रातील युवा पिढीच्या प्रेरणेचे प्रतीक बनले आहे. मराठवाड्यातील नादरपूर या छोट्याशा गावातून सुरू झालेला त्यांचा प्रवास आज राष्ट्रीय स्तरावर पोहोचला आहे. अवघ्या २८व्या वर्षी ६०० हून अधिक लोकांना रोजगाराची संधी देणारे आणि पारंपरिक ज्ञानाचा आधुनिकतेशी समन्वय साधणारे डॉ. जोशी हे एक उद्योजक, लेखक आणि वैदिक ज्ञानाचे संवर्धक आहेत. त्यांच्या कार्यामुळे समाजात भारतीय संस्कृती आणि उद्यमशीलता यांचा आदर्श निर्माण झाला आहे.

डॉ. जोशी यांचा जन्म आणि बालपण नादरपूर, ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर येथे साधारण कुटुंबात झाले. त्यांच्या पालकांनी नादरपूर येथे एक छोटे हॉटेल चालवून आपल्या कुटुंबाचे पालनपोषण केले. आर्थिक अडचणी असूनही, त्यांनी आपल्या मुलांच्या शिक्षणावर भर दिला. कुटुंबातील संघर्षाने डॉ. जोशी यांना कठोर परिश्रम करण्याची प्रेरणा दिली. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून वाणिज्य शाखेत पदवी प्राप्त केली आणि त्याचबरोबर अॅक्युप्रेशर, निसर्गोपचार,आणि मानसशास्त्रात शिक्षण पूर्ण केले.

डॉ. जोशी यांनी आपल्या उद्योजकीय प्रवासाची सुरुवात समर्पण बिझनेस ग्रुप या संस्थेच्या स्थापनेने केली. त्यांनी आपल्या आध्यात्मिकतेच्या आणि भारतीय परंपरांच्या जाणिवांना आधुनिक उद्योजकतेशी जोडण्याचे धाडस दाखवले. या संस्थेद्वारे त्यांनी श्री वैदिक विज्ञान संशोधन केंद्र ची स्थापना केली आणि वैदिक ज्ञानाला समर्पित असलेल्या उत्पादनांची निर्मिती सुरू केली.

साबण, पूजा साहित्य, अगरबत्ती, केसांचे तेल अशा दैनंदिन जीवनातील वस्तूंच्या उत्पादनात त्यांनी पारंपरिक ज्ञानाचा वापर केला आहे. राजस्थानच्या अनुकूल व्यावसायिक वातावरणाचा फायदा घेत, अवघ्या २६व्या वर्षी त्यांनी एक व्यापक व्यवसाय उभा केला, जो संपूर्ण भारतभर ६०० हून अधिक लोकांना रोजगार उपलब्ध करून देत आहे.

समर्पण बिझनेस ग्रुप ही केवळ एक उत्पादन कंपनी नसून विविध उद्योगांमध्ये कार्यरत आणि नियोजित असलेली एक व्यापक संस्था आहे. या गटामध्ये 'अदिती ज्योतिष सेवा,' 'भारत आयुर्वेद फार्मा,' 'दत्तांश अॅग्रो प्रा. लि.,' 'भाग्योदय फूड आउटलेट चेन,' 'समर्पण पब्लिकेशन,' 'समर्पण टॅलेंट सर्च परीक्षा,' 'समर्पण हीलिंग सेंटर,' 'स्वराज्य क्रेडिट यूनियन,' 'श्रद्धा गोशाळा,' 'समर्थ वास्तू,' 'वैष्णवी फूड प्रॉडक्ट्स,' 'सह्याद्री फिल्म्स,' आणि 'श्री वेद विज्ञान संशोधन केंद्र' या विविध शाखांचा समावेश आहे. प्रत्येक उपक्रमामध्ये डॉ. जोशी यांच्या पारंपरिक ज्ञान आणि आधुनिक व्यवस्थापन कौशल्यांचा अनोखा संगम दिसून येतो.

डॉ. अविनाश (अनाहत) जोशी यांची कामगिरी त्यांच्या अनेक पुरस्कारांमधून सिद्ध होते. 'इंडियन आयडॉल ऑफ इंप्रेशन २०१९,' 'महाराष्ट्र युथ आयकॉन २०२०,' 'क्रिएटिव्ह एंटरप्रेन्योर ऑफ इंडिया २०२३,' आणि 'नॅशनल प्राईड अवॉर्ड २०२३' हे त्यांना मिळालेले काही महत्त्वाचे पुरस्कार आहेत. २०२४ मध्ये त्यांना छत्रपती उद्योग सेवा गौरव पुरस्कार मिळाला, ज्यामुळे ते



महाराष्ट्रातील उद्योजकांच्या पंक्तीत आदर्श ठरले आहेत. सध्या राजस्थान येथील उदयपूर येथे कार्यरत असलेले डॉ. जोशी हे पर्यायी वैद्यकीय पद्धतींचे अभ्यासक आहेत. निसर्गोपचार, मंत्र चिकित्सा, रेकी, ज्योतिषशास्त्र, आणि वास्तुशास्त्र अशा अनेक विषयांत त्यांनी विशेष प्राविण्य मिळवले आहे. आधुनिक आणि पारंपरिक चिकित्सा पद्धतींचा समन्वय साधत त्यांनी आरोग्यसेवा क्षेत्रातही आपला ठसा उमटवला आहे.उद्योजकीय क्षेत्रातील योगदानासोबतच, डॉ. जोशी हे एक उत्कृष्ट लेखक आहेत. त्यांनी मराठी, हिंदी, आणि इंग्रजी या तीन भाषांमध्ये विविध वर्तमानपत्रांमधून आपल्या लेखणीद्वारे विचार मांडले आहेत. त्यांच्या लेखांमधून वैदिक ज्ञान, आयुर्वेद, आणि जीवनशैली विषयक दृष्टीकोन सखोलपणे मांडला जातो.डॉ. अविनाश (अनाहत) जोशी यांचा प्रवास हा केवळ एका व्यक्तीचा यशोगाथा नसून, त्याग, समर्पण, आणि दृढनिश्चयाने समाजाचा कसा विकास होऊ शकतो याचा आदर्श आहे. पारंपरिक भारतीय ज्ञानाचे पुनरुज्जीवन करत, आधुनिकतेशी त्याचा समन्वय साधण्याची त्यांची भूमिका नवउद्योजकांसाठी प्रेरणादायी ठरते. डॉ. जोशी हे नाव आता केवळ एक उद्योजक न राहता समाजाच्या विविध स्तरांवर सकारात्मक बदल घडवणारा एक महत्त्वाचा आवाज आहे.

# डॉ.संजय साबळे यांना 'उत्कृष्ट ग्रंथपाल पुरस्कार'

**वरोरा । प्रतिनिधी**

आनंद निकेतन विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, आनंदवन-वरोरा येथील ग्रंथपाल व अधिसभा सदस्य डॉ. संजय नारायणराव साबळे यांना गोंडवाना विद्यापीठाचा पहिला 'पद्मश्री डॉ. एस.आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथपाल पुरस्कार' मिळाला आहे. हा सन्मान त्यांना विद्यापीठाच्या वर्धापन दिन सोहळ्यात, गडचिरोली येथे प्रदान करण्यात आला.




गोंडवाना विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या हस्ते सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र, शाल, श्रीफळ आणि दहा हजार रुपयांचे पारितोषिक डॉ. साबळे यांना प्रदान करण्यात आले. यावेळी गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, प्र-कुलगुरु डॉ. श्रीराम कावळे, माजी कुलगुरू डॉ. विजय आईंचवार आणि कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण उपस्थित होते.डॉ. साबळे यांनी पुरस्काराची रक्कम महारोगी सेवा समिती, आनंदवन संस्थेस देणगीदाखल सुपूर्द केली. ते मागील ३१ वर्षांपासून आनंद निकेतन महाविद्यालयात कार्यरत असून, त्यांनी महाविद्यालयाच्या समृद्ध ग्रंथालयाच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे. वाचनसंस्कृती वृद्धींगत करण्यासाठी त्यांनी अनेक उपक्रम राबविले आहेत.डॉ. संजय साबळे यांना यापूर्वी नागपूर विद्यापीठाच्या ग्रंथपाल संघटनेचा 'चणउङ- - ङळलीरीळरप ेष ींहश धशरी २०१०' पुरस्कार प्राप्त झाला आहे. त्यांच्या या यशाबद्दल महारोगी सेवा समितीचे सचिव डॉ. विकास आमटे, प्राचार्य डॉ. मृणाल काळे यांच्यासह विविध मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# चंद्रपूर बसस्थानकाचे उर्वरित काम त्वरित करण्याचे कंत्राटदाराला निर्देश

## पाणी गळतीबाबत विभाग नियंत्रकाचे स्पष्टीकरण

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्य परिवहन महामंडळ, चंद्रपूर विभागामार्फत चंद्रपूरच्या बसस्थानकाचे सद्यास्थितीत बांधकाम प्रगतीपथावर आहे. प्रवाशी वाहतुकीच्या दृष्टिकोनातून तळमजल्यावरील काही आस्थापना हस्तातंरीत करून प्रवाशी वाहतूक करण्यात येत आहे. इतर सर्व आस्थापना कंत्राटदाराकडून हस्तातंरीत होणे बाकी आहे.

राज्य परिवहन चंद्रपूर बसस्थानक मध्ये पावसाचे पाणी गळतीबाबत तात्कालिन विभागीय अभियंता यांनी पाहणी करून सर्व आवश्यक दुरुस्ती व



उर्वरित कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत कंत्राटदाराला ३ ऑगस्ट २०२४ रोजी कळविले आहे. सदर दुरुस्तीचे काम सुरू असतानाच आर.सी.सी.वॉल व टिन पत्रे यांना जोडणा-या भागापासून पाणी गळती होऊ नये, म्हणून पाणी गळतीरोधक प्रक्रिया करण्याकरिता सदर शीटवरील जोड खुला करण्यात आला होता. ८ ऑक्टोबर रोजी मुसळधार पाऊस आल्यामुळे पाणी गळती झाली. याबाबत कार्यकारी अभियंता, रा.प. नागपूर यांनी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी भेट देऊन सदर कंत्राटदाराला दुरुस्तीचे काम तातडीने करण्याबाबत सूचना दिल्या आहेत, असे विभाग नियंत्रक राज्य परिवहन,चंद्रपूर यांनी कळविले आहे.

# लातूरमध्ये गुटखा व दारू बंदीच्या नियमांचा उलंघन

## विक्रेत्यांवर कडक कारवाईची मागणी

**लातूर । प्रतिनिधी**

लातूर व उदगीरच्या जिल्ह्यात गुटखा व दारू बंदी लागू असली तरी प्रत्यक्षात प्रत्येक तालुक्यात अवैध दारू आणि गुटखा विक्री जोमाने सुरू आहे. प्रत्येक तरुणाच्या खिशात रजनी गंधा, विमल यांसारखी सुगंधी तंबाखू, दारू आणि गुटखा सहज उपलब्ध आहे, ज्यामुळे बंदीचे नियम फोल ठरले आहेत.अन्न व औषध प्रशासनातील निरीक्षक गेल्या १० ते १५ वर्षांपासून एकाच ठिकाणी कार्यरत असल्याने त्यांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. त्यांनी केलेल्या कारवाईवरही शंका व्यक्त केली जात आहे, कारण जेव्हा स्थानिक प्रशासनाला तक्रारी दिल्या जातात, तेव्हा त्या तात्काळ गुटखा विक्रेत्यांच्या व्हॉट्सअॅपवर पोहचतात. त्यामुळे विक्रेते काही वेळासाठी गुटखा थांबवतात, पण त्यानंतर पुन्हा विक्री सुरू करतातलातूरच्या नागरिकांनी विक्रेत्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे. त्याचबरोबर, प्रशासनाच्या अधिकाऱ्यांची बदली का होत नाही, याबद्दल अनेक गमतीदार चर्चा लातूर शहरात सुरू आहेत. गेल्या वीस वर्षांपासून एकाच चौकीत स्थिर असलेल्या अधिकाऱ्यांचा पाठराखण करणारे कोण आहेत, याबद्दलही चिंतेचा विषय बनला आहे. लातूर व उदगीरच्या नागरिकांनी गुटखा व दारू मुक्त करण्याच्या दृष्टीने प्रशासनाकडे आशा व्यक्त केली आहे. विक्रेत्यांवर कडक कारवाई करणे आणि दोषी अधिकाऱ्यांची बदली करणे आवश्यक आहे, असे त्यांचे मत आहे.

# सावली तालुक्यात भाजप आणि वंचितचे कार्यकर्ते काँग्रेसमध्ये सामील

**सावली । प्रतिनिधी**

सावली तालुक्यात वंचित बहुजन आघाडी आणि भारतीय जनता पक्ष (भाजप) यांना खिंडार पडल्याचे स्पष्ट होत आहे. वंचित बहुजन आघाडीचे सावली शहर अध्यक्ष रोशन बोरकर, उपाध्यक्ष नितीन दुधे व भाजपचे कार्यकर्ते संतोष कोटरंगे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. या पक्ष प्रवेशामुळे सावली शहरात इतर पक्षांमधून काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याचा प्रवास सुरू झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांचा राज्यभर वाढता प्रभाव आणि शहरातील विकासकामांचा झंझावात पाहता इतर पक्षांतील कार्यकर्त्यांची काँग्रेसमध्ये भरती



सुरू झाली आहे. या कार्यक्रमात वंचित बहुजन आघाडीचे सावली शहर अध्यक्ष रोशन बोरकर आणि शहर उपाध्यक्ष नितीन दुधे यांच्यासह भाजपचे कार्यकर्ते संतोष कोटरंगे यांचा समावेश आहे.हा पक्ष प्रवेश कार्यक्रम सिंदेवाही तालुक्यातील एका विशेष कार्यक्रमात आयोजित करण्यात आला होता, ज्यामध्ये विजय वडेट्टीवार उपस्थित होते. या कार्यक्रमात सोनी नितीन दुधे, मीनाक्षी मिलिंद वाळके, लोमेश दासरवार, रोहित आलेवार, प्रज्वल पवार, विशाल लाटेलवार, सौरभ गोरडवार, निलेश येनुगवार, रवी वाढई, सुमित लेनगुरे, हर्षद मोहुर्ले, गणेश वाढई, महेश मांदाडे, मिलिंद शेंडे, आणि सुरज लेनगुरे यांसारख्या कार्यकर्त्यांचा समावेश होता.या कार्यक्रमास सावली काँग्रेस तालुका अध्यक्ष नितिन गोहने, सावली उपनगराध्यक्ष संदिप पुण्यपकार, माजी नगराध्यक्ष विलास यासलवार, पाणी पुरवठा सभापती प्रितम गेडाम, नगरसेवक गुणवंत सुरमवार, प्रकाश जक्कुलवार, प्रशांत राईचवार, चंद्रकांत संतोषवार, नगरसेवक मुन्ना रस्ते, आकाश खोब्रागडे, निखिल दुधे, गब्बर दुधे, मयूर दुधे, धम्मदिप बोरकर, अनिकेत वाळके, मिथून गणविर प्रामुख्याने उपस्थित होते. यामुळे काँग्रेस पक्षात उगवती सूर्याची किरणे मानल्या जात आहेत आणि इतर पक्षांचे कार्यकर्ते काँग्रेसमध्ये सामील होण्याची प्रेरणा घेत आहेत.

# महात्मा गांधी कॉलेज ऑफ सायन्समध्ये एक दिवसीय विज्ञान परिषद संपन्न

**गडचांदूर । प्रतिनिधी**

गडचांदूर येथील महात्मा गांधी कॉलेज ऑफ सायन्स मध्ये दिनांक ५ ऑक्टोबर २०२४ रोज शनिवारला एकदिवसीय विज्ञान परिषद आयोजित करण्यात अली होती. विज्ञानाच्या आधारेच विकास साधता येतो मात्र मानवी मूल्याची जपवणूक करूनच हा विकास व्हायला हवा असे प्रतिपादन उदघाटन सत्राचे अध्यक्ष आमदार सुभाष धोटे यांनी व्यक्त केले. या परिषदेचे उदघाटन अधिष्ठाता डॉ. अनिल चिताडे यांनी केले. याप्रसंगी गडचांदूर शिक्षण प्रसारक मंडळ गडचांदूर चे सचिव धनंजय गोरे, सहसचिव उज्वला धोटे उपस्थित होते. ही विज्ञान परिषद अल्ट्राटेक सिमेंट कंपनी यांच्या सहकार्याने घेण्यात आल्याने कंपनीचे जॉईंट प्रेसिडेंट व युनिट




हेड अतुल कंसल व सिनिअर वाईस प्रेसिडेंट व एच. आर हेड मुकेश गहलोत यांनी मार्गदर्शन केले. विज्ञानाच्या विविध पैलूचा वापर करूनच गडचांदूर येथील वाढता धूर रोखल्या जाऊ शकते. असे त्यांनी सांगितले. सर्व पाहुण्यांचे स्वागत करून महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा प्राचार्य, डॉ. शैलेंद्र देव यांनी सादर केला. कार्यक्रमाची प्रस्तावना संयोजक डॉ संदीप घोडीले, संचालन डॉ. उत्कर्ष मून आभार प्रदर्शन ग्रंथपाल प्रा. मनोहर बांदरे यांनी केले. जवळपास २५० संशोधकांनी परिषदेसाठी आपली नोंदणी केली असून २० संशोधकांनी पेपर प्रस्तुतीकरण व तितक्याच लोकांनी पोस्टर प्रस्तुतीकरण केले.

# शेगाव बु येथे मोफत डोळे तपासणी व चष्मे वाटप शिबीर संपन्न

**वरोरा । प्रतिनिधी**

चला बदल घडवूया या मोहिमेअंतर्गत वरोरा-भद्रावती मतदार संघात विविध सकारात्मक व समाज उपयोगी उपक्रम जोरात राबविण्यात येत आहेत. यामध्ये डोळे तपासणी, आरोग्य तपासणी शिबिरे, मॅरेथॉन स्पर्धा, व्यवसाय मार्गदर्शन, प्रेरणेतून प्रगती, आणि नवरात्रोत्सवात जागृत व्हा तरुणांनो अशा उपक्रमांचा समावेश आहे.

याच मोहिमेच्या अंतर्गत डॉ. चेतन खुटेमाटे यांच्या संकल्पनेतून शेगाव बु येथे ६ ऑक्टोबर रोजी मोफत डोळे तपासणी व चष्मे वाटप शिबीराचे आयोजन करण्यात आले.

या शिबीराला शेगाव बु, धानोली, दादापूर, महालगांव, मेसा, सालोरी, वडधा, बोरगाव, सोनेगांव, उमरी या गावातील ९८३ नागरिकांनी



उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आणि डोळे तपासणी केली.कार्यक्रमाचे उद्घाटन बालाजी ढाकुणकर यांनी केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. चेतन खुटेमाटे होते. प्रमुख पाहुणे म्हणून तेजस्विनी बुराण, नितीन खंगार, मोहित लभाने, विद्या खाडे, चंद्रहास मोरे, अभिजीत पावडे, अनिल चांगले, शेरखान पठान, विवेक गोवारदिपे, बाबा खाटीक, दशरथ देहारकर, वसंत निखाडे, नरेंद्र कन्नाके, अक्षय बोंदगुलवार हे मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक कामेश कुरेकार यांनी केले, संचालन संतोष भोयर यांनी केले, तर आभार प्रदर्शन संयोग कुकूडकर यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीत करण्यासाठी गुरुदृष्टी नेत्रालयाची सर्व टीम व ईश्वर वाभिटकर, विश्वनाथ दांडेकर, वेद ठावरी, मनिष हनवते, सचिन खुटेमाटे, भूषण साखरकर, किरण चौधरी, काजल पाटील, पुनम झाडे, स्नेहल नंदनवार, दिक्षा साखरकर, कल्याणी कापटे, तनु कन्नाके, रक्ष कुंदनकर यांनी अथक प्रयत्न केले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# स्वाती मिश्रा यांच्या भक्तिगीतांनी महाकाली महोत्सवात भक्तिरसाची उधळण

## सायबर सेलचे महिलांना मार्गदर्शन,नवरात्रीत जन्मलेल्या कन्यांना चांदीचा शिक्का वाटप

### भिक्खु संघाच्या वतीने अम्माच्या प्रकृतीसाठी प्रार्थना

**सध्या वर्षवासाचा पवित्र महिना सुरू आहे. त्या निमित्ताने महाकाली महोत्सवात भिक्खु संघाला आमंत्रित करण्यात आले होते. यावेळी त्यांना चिवर व फळदान करण्यात आले. भिक्खु संघाने अम्माच्या प्रकृतीत सुधारणा होण्यासाठी प्रार्थना केली. या प्रसंगी महाराष्ट्र प्रदेश भिक्खु संघाचे सचिव पूज्य भदंत महाथेरो सुमणवंन्नो, महाथेरो नागदीपंकर, संघवंश थेरो, आनंद थेरो, प्रज्ञानंद, गनानंद आदींची प्रमुख उपस्थिती होती.**






**चंद्रपूर । प्रतिनिधी**

श्री माता महाकाली महोत्सवात सुप्रसिद्ध गायिका स्वाती मिश्रा यांनी भक्तिरसाने ओथंबलेल्या सुरांनी वातावरण भक्तीमय केले. त्यांच्या भक्तिगीतांनी महाकाली महोत्सवाला आध्यात्मिक उधाण दिले. स्वाती मिश्रा यांचे गायन ऐकण्यासाठी शहरातील हजारो भाविकांनी महोत्सवात हजेरी लावली होती. स्वाती मिश्रा यांच्या भक्तिगीतांनी महाकाली महोत्सवात भक्तिरसाची उधळण झाली.

सायंकाळच्या आरतीनंतर स्वाती मिश्रा यांच्या भक्तीगीत कार्यक्रमाला सुरुवात झाली. राम आयेंगे या गाण्याने रसिकांना मंत्रमुग्ध केले. स्वाती मिश्रा यांनी आपल्या ओजस्वी आवाजात गीतांची स्वरमाला गुंफत उपस्थितांना भक्तिरसात न्हाहून काढले. स्वाती मिश्रा यांच्या सुरेल आवाजातील गोडवा आणि त्यांच्या गाण्यांमधील भक्तिभावनेचा ओलावा यामुळे प्रत्येक श्रोत्याने भक्तिरसाचा आस्वाद घेतला. यावेळी आमदार किशोर जोरगेवार आणि श्री महाकाली माता महोत्सव ट्रस्टचे पदाधिकारी उपस्थित होते. त्यांनी स्वाती मिश्रा यांचा मातेची मूर्ती देऊन सन्मान केला.तर दुपारी ९९९ माऊलींचा पातळ देऊन सन्मान करण्यात आला. दुपारी १ वाजता सूर्योदय साहित्य व सांस्कृतिक मंचाच्या वतीने जागर कवितेचे महिलांचे कवी संमेलन पार पडले. दुपारी ३ वाजता स्थानिक कलावंतांच्या नृत्य जल्लोष कार्यक्रमाने नृत्य प्रेमींना नृत्यकलेची अनुभूती दिली. तर नवरात्री दरम्यान जन्मलेल्या कन्यांचा चांदीचा शिक्का देऊन गौरव करण्यात आला.

**उद्याचे कार्यक्रम** –सकाळी ९ वाजता महाआरतीने कार्यक्रमांना सुरुवात होईल. नंतर गायत्री परिवाराच्या वतीने शक्ती संवर्धन व पर्यावरण संरक्षण महायज्ञ होणार आहे. तर सायंकाळी ४ वाजता महाकाली मंदिर येथून श्री माता महाकाली नगर प्रदक्षिणा पालखीला प्रारंभ होणार असून यात मुझे चढ गया भगवा रंग या गाण्याच्या गायिका शहनाज अख्तर यांचा रोड शो असणार आहे.

# सुवर्णा भानुदास भंडारे यांना तालुका स्तरीय गुरु गौरव पुरस्कार प्रदान



**नांदेड । प्रतिनिधी**

हदगाव तालुक्यातील बाभळी येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षिका सुवर्णा भानुदास भंडारे यांना तालुका स्तरीय गुरु गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. हा पुरस्कार आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांच्या हस्ते देण्यात आला.

पुरस्कार वितरणाच्या कार्यक्रमास गट शिक्षणाधिकारी फोले, प्राथमिक शिक्षक संघाचे तालुका अध्यक्ष प्रवीण पाटील बाभळीकर, विद्रोही शिक्षक संघटनेचे गुणवंत काळे , मानीकराव कदम , अखिल भारतीय शिक्षक परिषदेचे तालुका अध्यक्ष उल्हास चव्हाण आणि पुरोगामी शिक्षक संघटनेचे तालुका अध्यक्ष आ. भा. स. टाले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.भंडारे यांना मिळालेल्या या पुरस्कारामुळे बाभळी गावात ग्रामस्थांनी मोठा आनंद व्यक्त केला आहे.

# धानोरे येथे नवरात्री निमित्त अखंड हरिनाम शारदीय नवरात्र उत्सव

**राहुरी । प्रतिनिधी**

धानोरे, ता. राहुरी येथे श्री अंबिका माता व कळमजाई माता नवरात्र उत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह आणि श्रीदुर्गा सप्तशती पाठ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा ३७ वर्षांपासून अविरतपणे सुरू आहे, आणि याही वर्षी घटस्थापनेपासून म्हणजेच गुरुवार, दि. ३ ते १२ ऑक्टोबर २०२४, विजयादशमीपर्यंत चालणार आहे. सप्ताहाच्या पहिल्या दिवशी हरिभक्त परायण अश्विनीताई हारदे यांनी कीर्तन सेवा केली. या सोहळ्यात महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांची कीर्तन सेवा पार पडणार आहे. संपूर्ण सप्ताहाचे नियोजन ह.भ.प. बाळकृष्ण महाराज कांबळे यांनी केले असून, ग्रामस्थ, अंबिका माता भजनी




मंडळ, अंबिका माता तरुण मंडळ, धनेश्वर साई निर्माण ग्रुप, राजमाता मित्र मंडळ, स्वराज्य सेना मित्र मंडळ, दिघे वस्ती शिंदे वस्ती मित्र मंडळ, राजे छत्रपती युवा मंच यांनी उत्कृष्ट व्यवस्थापन केले आहे. भक्तिमय वातावरणात भाविक मोठ्या संख्येने या ठिकाणी उपस्थित राहत आहेत. कीर्तन महोत्सव प्रसंगी ग्रामस्थांकडून संतपूजन केले जाते. कीर्तन सोहळ्यानंतर सर्व भाविकांसाठी महाआरती आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. नवरात्र उत्सव समिती तसेच डॉ. वि.वि.पाटील सहकारी साखर कारखान्याचे संचालक किरण सुधाकर पा. दिघे, उपसरपंच ज्ञानेश्वर संतू पा. दिघे, माजी उपसरपंच जयराम भगवंत पा. दिघे आणि संयोजकांनी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. नवरात्र उत्सव काळात दानशूर ग्रामस्थ खिचडी प्रसाद देतात. तसेच गायकवृंद, मृदुंगाचार्य, हार्मोनियम वादक आणि टाळकरी आपापल्या परीने सेवा देत आहेत. शुक्रवार, ११ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ८ वाजता अंबिका माता प्रतिमा व कलश मिरवणूक, होमहवन आणि कळयाचे कीर्तन होईल. त्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होईल.

# झाडबोरी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी मुनाज शेख यांची निवड

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील झाडबोरी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीची नवी



कार्यकारिणी गठीत करण्यात आली आहे. या समितीच्या अध्यक्षपदी मुनाज कालू शेख यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे, तर उपाध्यक्षपदी हमजू नन्नू शेख यांची निवड करण्यात आली. या कार्यकारिणीत अन्य सदस्य म्हणून शिराजूल शेख, कलाम अनवर शेख, इस्लाम रतन शेख, पुनम दीपक ठिकरे, महिला सदस्य मंजुषा मंगेश नेवारे, मंगला राजेंद्र राऊत, गयाबाई प्रभाकर गिरडकर, सोनू देवानंद गुरनुले, नंदकिशोर शेषराव आवनकर यांचा समावेश करण्यात आला आहे. समितीचे सचिवपद किशोर कृष्णराव पराते यांनी भूषवले आहे.शाळा व्यवस्थापन समितीच्या नव्या कार्यकारिणीला शाळेच्या विकासासाठी एकत्रित काम करण्याची संधी मिळाल्यामुळे गावकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

# शिर्डी आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या एकात्मिक टर्मिनल इमारतीचे भूमिपूजन दूरदृष्य प्रणालीने संपन्न




**अहमदनगर । प्रतिनिधी**

आज शिर्डी आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या एकात्मिक टर्मिनल इमारतीचे भूमिपूजन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत दूरदृष्य प्रणालीद्वारे संपन्न झाले. या कार्यक्रमाला महामहीम राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

शिर्डी येथील कार्यक्रमात महसूल मंत्री व अहमदनगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार आशुतोष काळे, जिल्हाधिकारी सिध्दराम सालीमठ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर आणि शिर्डी संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमामध्ये सर्व मान्यवरांनी एकात्मिक टर्मिनलच्या भूमिपूजनाची महत्त्वपूर्ण घटना साजरी केली, ज्यामुळे शिर्डी विमानतळाच्या विकासाला नवे परिमाण मिळणार आहे.

# महायुतीच्या समन्वय समितीत चंदनसिंग चंदेल, मंगेश पोटवार, कमलेश शुक्ला यांची नियुक्ती







**मूल । प्रतिनिधी**

बल्लारपूर विधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते चंदनसिंग चंदेल, राष्ट्रवादी काँग्रेसचे मूल तालुका अध्यक्ष मंगेश पोटवार, आणि शिवसेनेचे कमलेश शुक्ला यांची समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यात लवकरच विधानसभेच्या निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू होण्याची शक्यता असून, या निवडणुकीत महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा थेट सामना होईल, असे संकेत आहेत. महायुतीत भाजप, शिवसेना शिंदे गट, आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांचा समावेश आहे. प्रचारात समन्वय आणि सुसूत्रता राखण्यासाठी २८८ मतदारसंघांसाठी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांची समन्वयक समिती नेमण्यात आली आहे.

महायुतीचे उमेदवार आणि राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यविकास मंत्री आणि चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांना प्रचंड मताने विजय मिळवून देण्याचा संकल्प समितीच्या सदस्यांनी केला आहे, असे मंगेश पोटवार यांनी 'सह्याद्रीचा राखणदार'शी बोलताना सांगितले.

# ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशनच्या नेतृत्वाखाली बस स्थानक जाम;विद्यार्थ्यांच्या विनामूल्य बस सेवेसाठी आंदोलन

## भंडारा जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचे आंदोलन:एस.टी.बस सेवा समस्यांवर तीव्र प्रतिक्रिया

**भंडारा । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील एस.टी. बससेवेच्या समस्यांचा सामना विद्यार्थ्यांना वारंवार करावा लागत आहे. एस.टी. महामंडळाकडून यावर कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्यामुळे विद्यार्थ्यांनी संताप व्यक्त केला. ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन (एआयएसएफ) या विद्यार्थी संघटनेच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी भंडारा शहरातील मुख्य बस स्थानक तासभर अडवून ठेवले. या आंदोलनात संघटनेचे राज्य सचिव कॉम्रेड वैभव चोपकर व जिल्हाध्यक्ष कॉम्रेड रवी बावणे यांना पोलिसांनी ताब्यात घेतले.

भंडारा जिल्ह्यातील ग्रामीण आणि दुर्गम भागांत एस.टी. बससेवा बंद करण्यात आल्याने विद्यार्थी त्रस्त आहेत. बस वेळेवर येत नाहीत, बस चालक व वाहकांची विद्यार्थ्यांशी वागणूक योग्य नसल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. दुसरीकडे, खाजगी शाळांसाठी अविरत बससेवा पुरवली जात आहे, ज्यात सनफ्लॅग, फादर एंजल्स आणि माणिक नगर शाळांचा समावेश आहे.

विद्यार्थ्यांच्या या समस्यांवर तातडीने उपाययोजना न केल्यामुळे विद्यार्थ्यांनी आंदोलन करण्याचा निर्णय घेतला. आंदोलनादरम्यान पोलिसांनी काही नेत्यांना ताब्यात घेतल्यावर विद्यार्थ्यांनी मुख्य रस्ता अडविला, त्यामुळे पोलिसांना कॉम्रेड चोपकर आणि रवी बावणे यांना सोडावे लागले.

यावेळी एस.टी. महामंडळाच्या अधिकाऱ्यांशी विद्यार्थ्यांची चर्चा झाली. त्यात काही मागण्या मान्य करण्यात आल्या, जसे की विद्यार्थ्यांच्या नियोजित मार्गावर बस वेळेवर येणे-जाणे, सर्व शासकीय आयटीआय समोर सुपर बस थांबविणे, वाहक-चालकांची सौजन्याने वागणूक असणे. त्याचबरोबर, विद्यार्थ्यांसाठी शंभर टक्के विनामूल्य बससेवा, खाजगी शाळांची बससेवा बंद करणे, आणि सीएसआर फंडातून बस खरेदी करून विद्यार्थ्यांना विनामूल्य सेवा देण्याची मागणी करण्यात आली.आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले असून, दोन आठवड्यांत समस्या सुटल्या नाहीत तर मोठे आंदोलन होईल, असा इशारा राज्य सचिव कॉम्रेड वैभव चोपकर यांनी दिला. यावेळी जिल्हाध्यक्ष कॉम्रेड रवी बावणे, जिल्हा सचिव कॉम्रेड विश्वजित, उपाध्यक्ष कॉम्रेड प्रणय, सहसचिव कॉम्रेड साहिली, आणि इतर विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# कलासेतू पोर्टल कलावंतांसाठी हक्काचे माहेरघर–सांस्कृतिक कार्यमंत्री ना.सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला विश्वास

## ना.मुनगंटीवार यांनी कलावंतांना आणले ऑनलाइन व्यासपीठावर

**मुंबई । प्रतिनिधी**

सदैव कलावंतांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे राज्याचे सांस्कृतिक मंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी राज्यभरातील कलावंतांना कलासेतू या ऑनलाइन व्यासपीठाच्या माध्यमातून एकत्र आणले आहे. त्यांच्या संकल्पनेचे सांस्कृतिक क्षेत्रात स्वागत होत आहे. या पोर्टलचे ना मुनगंटीवार यांच्या हस्ते थाटात उद्घाटन झाले.मंत्रालयातील कार्यालयात झालेल्या कार्यक्रमाला सांस्कृतिक कार्य विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे, दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या व्यवस्थापकीय संचालिका स्वाती म्हसे पाटील, भाजपा चित्रपट आघाडी प्रमुख संदीप घुगे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

राज्यातील मराठी लेखक,दिग्दर्शक यांच्यासाठी राज्यसरकारने नवे ऑनलाइन व्यासपीठ तयार केले आहे. कलासेतू या नव्या मराठी पोर्टलचे उद्घाटन राज्याचे वने, सांस्कृतिक कार्ये व मत्सव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते करण्यात आले. कलासेतू पोर्टल हे व्यासपीठ विशेषतः चित्रपट कथा आणि पटकथा लेखकांसाठी त्यांच्या कथा-पटकथा-संहिता अपलोड करण्यासाठी, नोंदणी करण्यासाठी आणि प्रदर्शित करण्यासाठी तयार केलेले आहे. या व्यासपीठाद्वारे निर्माते, दिग्दर्शक आणि सृजनशील क्षेत्रातील तसेच मनोरंजन विश्वातील व्यक्तींसाठी थेट संकेतस्थळावरुन कथा, संकल्पना, पटकथा पाहण्यासाठी आणि मुल्यमापन करण्यासाठी सहायभूत तसेच उपलब्ध होणार आहेत. कोणत्याही पटकथा लेखकाला त्याचे काम अपलोड करण्याची सुविधा देऊन हा मंच त्यांच्यासाठी जगासमोर येण्याची आणि चित्रपट लेखनाच्या जगात स्वतःची ओळख निर्माण करण्याची मोठी संधी ठरणार आहे. लेखक आपले काम जगातील कोणत्याही ठिकाणावरुन कोणत्याही वेळी आपली कथा-पटकथा-संहिता या पोर्टलवर काही सोप्या टप्प्यांमध्ये नोंदवू शकतो. कलासेतू पोर्टल सृजनशील लेखक आणि नविन कल्पनांच्या शोधात असणारे कलासक्त निर्माते/संस्था तसेच इतरही घटकांसाठी सेतू म्हणून काम करेल तसेच चित्रपट उद्योगाच्या अखंड वाटचालीसाठी एक विश्वासार्ह, महत्वाचे व्यासपीठ म्हणूनही काम करणार आहे.

नव्या सर्जनशील संकल्पनांच्या शोधात असलेली कलासक्त मंडळी आणि लेखणीच्या जोरावर नव्या विश्वाची निर्मिती करु पाहणारे होतकरु प्रतिभावंत यांच्यामधला हा अनोखा सेतू राज्याच्या आणि देशाच्या सांस्कृतिक नकाशाला अधिक व्यापक, समृध्द आणि वैश्विक करेल यात शंकाच नाही. कारण यथावकाश आणि क्रमाक्रमाने या अनोख्या पोर्टलद्वारे गीतकार, संगीतकार, सकंलक, छायालेखक, वेशभूषाकार, केशभूषाकार, निर्मिती प्रमुख, कला दिग्दर्शक अशा मनोरंजन क्षेत्रातील सर्व प्रकारच्या तंत्रज्ञ व कलावंतांसाठी हे व्यासपीठ हक्काचे माहेरघर बनेल असा दृढ विश्वास राज्याचे वने,सांस्कृतिक कार्ये व मत्सव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी कलासेतू पोर्टल मंचच्या उद्घाटनवेळी व्यक्त केली.



## डोंगरगाव शेतशिवारात वाघाचा मृत्यू, न्यूमोनिया संसर्गामुळे मृत्यूची शक्यता

**मूल । प्रतिनिधी**

तालुक्यातील डोंगरगाव शेतशिवरात वाघाचे मृतदेह आढळून आल्याने वनविभागात खळबळ उडाली आहे. प्राथमिक तपासानुसार, सदर वाघ हा मादी असून अंदाजे दीड वर्षाचा होता. वनविभागाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, न्यूमोनिया संसर्गामुळे वाघाचा मृत्यू झाल्याचा संशय आहे.

मूल आणि सावली तालुक्यात वाघांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. डोंगरगाव येथील माया रमेश सांगुळले यांच्या शेतात (सर्व्हे नं. १०३८) वाघाचे मृतदेह आढळून आले. शेतात कामासाठी गेलेल्या शेतकऱ्याने वाघ मृत अवस्थेत पाहिल्यानंतर गावकऱ्यांना कळवले. याची माहिती मिळताच वनविभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले आणि पंचनामा करण्यात आला.

वाघाचे मृतदेह चंदूर येथील टीटीसी केंद्रात नेण्यात आले, जिथे शवविच्छेदन करण्यात आले आणि



त्याच ठिकाणी मृतदेहाचे दहन करण्यात आले. घटनास्थळी विभागीय वनाधिकारी प्रशांत खाडे, सहायक वनसंरक्षक विकास तरसे, सावलीचे वनपरिक्षेत्र अधिकारी विनोद धुर्वे, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांचे प्रतिनिधी उमेश झिरे आणि राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन संघटनेचे प्रतिनिधी मुकेश भांडककर यांनी भेट देऊन पाहणी केली. यावेळी वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्नेहल कोल्हे यांच्या वाढदिवसानिमित्त २ कोटी ५१ लाखांचे कर्जवितरण

**कोपरगाव । प्रतिनिधी**

कोपरगाव विधानसभा मतदारसंघाच्या माजी आमदार स्नेहल कोल्हे यांच्या वाढदिवसानिमित्त संजीवनी स्वयं सहाय्यता महिला बचत गटांना २ कोटी ५१ लाखांचे कर्जवितरण करण्यात आले. येसगाव, चांदेकसारे, चासनळी आणि दहेगाव बोलका येथे हा कार्यक्रम संपन्न झाला.

महिला बचत गटांच्या सुरुवातीची आठवण सांगताना कोल्हे म्हणाल्या, महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हाव्यात यासाठी मी कठीण परिस्थितीत या कामाची सुरुवात केली. आजपर्यंत तीन हजारांहून अधिक बचत गट कार्यरत असून, त्यामधील तीस हजार महिला



आर्थिकदृष्ट्या सबल झाल्या आहेत. माझ्या वाढदिवसानिमित्त या महिलांमध्ये उपस्थित राहून त्यांच्याकडून शुभेच्छा मिळाल्या, हे माझ्यासाठी आनंदाचे आहे.त्यांनी महिलांच्या संघर्षाबद्दल बोलताना सांगितलं की, महिला नेहमीच प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढतात. समाजाने त्यांना सन्मानाने वागवायला हवं. महिला अत्याचाराच्या घटना घडताना मन व्यथित होतं, परंतु महिलांच्या समर्थतेमुळे अनेक क्रांतिकारक बदल घडू शकतात. ओम साई राम महिला बचत गट, येसगावच्या महिलांनी नवरात्रीत फराळाच्या पंगतीचे आयोजन केले होते, तसेच गाव सप्ताहात मोठी पंगत देऊन सामाजिक योगदानाचे उदाहरण घालून दिले आहे. यावेळी कर्जवितरण कार्यक्रमात विविध गटांच्या महिला भगिनींनी सहभाग घेतला. बँक ऑफ महाराष्ट्रच्या येसगाव शाखेच्या मॅनेजर पूजा आहेर यांचीही उपस्थिती होती.

## ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

### बिकली गावाजवळील अपघात



**नागभीड । प्रतिनिधी**

नागभीड-नागपूर राज्य मार्गावरील बिकली गावाजवळ सोमवारी दुपारी १ वाजताच्या सुमारास झालेल्या अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. साहील रवी देवाळे (वय १८, रा. कानपा) असे मृतकाचे नाव आहे.

साहील देवाळे काही कामानिमित्त एम.एच.४० टी.४७९६ या क्रमांकाच्या दुचाकीवरून नागभीडकडे येत असताना एम.एच.४० वाय.७९७८ क्रमांकाच्या ट्रकने भरधाव वेगात धडक दिली. या धडकेत साहीलचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच कानपा गावातील नागरिक घटनास्थळी धावले आणि नागभीड पोलिसांना कळवले.

मृतदेह शवविच्छेदनासाठी नागभीड ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला. या प्रकरणी ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलिस निरीक्षक रमाकांत कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली संजय मांढरे करीत आहेत. या घटनेमुळे कानपा गावात शोककळा पसरली आहे.

## काळेवाडी फाटा,ड्रायव्हर कॉलनी येथे मुक्ताई गायकवाड यांचा स्नेहमेळावा संपन्न



**सांगोला । प्रतिनिधी**

गोरक्षनाथ गवंड यांनी केले कार्यक्रमाचे आयोजन पुणे(सुभाष गाडे) सांगोला तालुक्याच्या विधानसभा निवडणुकीची तयारी सगळ्याच इच्छुक उमेदवारांनी सुरू केली आहे .पुणे जिल्ह्यातील काळेवाडी फाटा येथील ड्रायव्हर कॉलनी येथे सांगोला तालुक्यातील नोकरी,व्यवसायानिमित्त बहुसंख्य नागरिक राहतात.त्यांच्या अडीअडचणी समजून घेणे व आगामी विधानसभा निवडणुकी विषयी विचारविनिमय करण्यासाठी हा स्नेहमेळावा विठ्ठल रुक्मिणी मंदिर येथे घेण्यात आला.उपस्थित सगळ्यांना दीपक (आबांच्या)कन्या मा.मुक्ताई गणेश गायकवाड यांनी नवरात्रोत्सवाच्या शुभेच्या दिल्या व पुढे बोलताना त्या म्हणाल्या की,दीपक (आबा)साळुंखे पाटील हे २०२४ आगामी विधानसभा निवडणूक लढविणार आहेत.सांगोला तालुक्याचा विकास करण्यासाठी आबांना सगळ्यांनी साथ देवून सांगोला तालुक्याचे आमदार म्हणून निवडून देवूया.येत्या १३ ऑक्टोबर पुण्यात आबांच्या उपस्थित मोठा मेळावा आयोजित केला आहे त्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.हा स्नेह मेळावा दीपक (आबा)युवा मंच,पुणे यांनी आयोजित केला आहे. ड्रायव्हर कॉलनी,काळेवाडी फाटा येथील गोरक्षनाथ गवंड यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की,आबांच्या कामाची पद्धत खूप वेगळी आहे.त्यामुळे दीपक (आबा)हाच आमचा पक्ष आणि तेच आमचे नेते आहेत.त्यामुळे आबांना विधानसभेत पाठविण्यासाठी सगळ्यांनी जबाबदारीने काम करावे.या कार्यक्रमास सांगोला रहिवासी पुणेकरांची मोठ्या संख्येने महिला व पुरुष उपस्थित होते.

## समृद्धी महामार्गावर अपघाताचे प्रमाण वाढते; खंबाळा शिवारात बस-कंटेनर अपघात



**वैजापूर । प्रतिनिधी**

समृद्धी महामार्गावर अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. आज पहाटे पाच वाजता वैजापूर तालुक्यातील खंबाळा शिवारात एक भीषण अपघात घडला, ज्यामध्ये खाजगी बस आणि कंटेनर यांचा समावेश आहे. या अपघातात २० प्रवासी जखमी झाले असून, त्यापैकी ४ जण गंभीर अवस्थेत आहेत. माहितीनुसार, पहाटे ५ वाजता संभाजीनगरहून शिर्डीच्या दिशेने जात असलेल्या ट्रॅव्हल्स बसने कंटेनरला पाठीमागून धडक दिली. अपघातामुळे बसचा पुढील भाग संपूर्णतः चक्काचूर झाला आहे. जखमी प्रवाशांना वैजापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. गंभीर जखमी ४ जणांना छत्रपती संभाजीनगरच्या घाटी रुग्णालयात पाठवण्यात आले आहे. या अपघातामुळे प्रवासाच्या सुरक्षिततेच्या प्रश्नांची पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे, कारण समृद्धी महामार्गावर असे अपघात वाढत असल्याने प्रवाशांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

# इंदापूर येथे 'वृक्षारोपण महायज्ञ' उपक्रम संपन्न

**इंदापूर । प्रतिनिधी**

एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंट अंतर्गत इंदापूर येथे आज 'राष्ट्रीय सरपंच संसद' आणि 'महाराष्ट्र शासन - सामाजिक वनीकरण विभाग' यांच्या संयुक्त विद्यमाने 'वृक्षारोपण महायज्ञ' उपक्रमांतर्गत वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

'एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंट' अंतर्गत स्थापित 'राष्ट्रीय सरपंच संसद' आणि 'महाराष्ट्र शासन - सामाजिक वनीकरण विभाग' यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्यातील ३५१ तालुक्यांतील ३४०० ग्रामपंचायतींमध्ये 'वृक्षारोपण महायज्ञ' उपक्रमाअंतर्गत ३४ लाख वृक्षरोपांची लागवड करण्यात येत आहे. पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने, सरपंचांच्या नेतृत्वाखाली लोकसहभागातून हा उपक्रम यशस्वीपणे साकार होत आहे.

इंदापूर तालुक्यातील हॉटेल स्वामीराजच्या सभागृहात बुधवार, दि. ९ ऑक्टोबर २०२४ रोजी या उपक्रमांतर्गत वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास 'राष्ट्रीय सरपंच संसद' चे कार्याध्यक्ष व




प्रमुख समन्वयक योगेश पाटील, उपाध्यक्ष व सहसमन्वयक प्रकाशराव महाले, इंदापूरचे नायब तहसीलदार विजय घुगे, महसूल सहाय्यक राहुल पारेकर, वनाधिकारी अर्चना कवितेके आणि पोलिस अधिकारी माधुरी लडकत यांची प्रमुख उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे प्रमुख समन्वयक इंदापूर तालुका समन्वयक महेंद्र रेडके आणि तालुका महिला समन्वयक अनिता नानासाहेब खरात होते. कार्यक्रमाच्या संयोजनासाठी अतुल शिंगाडे, शिवकुमार गुणवारे आणि अनिता ताटे यांचे सहकार्य मिळाले. कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. स्वागत भाषण अनिता खरात यांनी केले, तर प्रास्ताविक महेंद्र रेडके यांनी केले. इंदापूर तालुक्यातील सरपंचांना वृक्षारोपणासाठी लागणाऱ्या वृक्षांचे वितरणपत्र 'राष्ट्रीय सरपंच संसद' चे कार्याध्यक्ष योगेश पाटील यांच्या हस्ते देण्यात आले.कार्यक्रमाच्या मार्गदर्शन सत्रात नायब तहसीलदार विजय घुगे, अर्चना कवितेके, माधुरी लडकत आणि प्रकाशराव महाले यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

इंदापूरचे सामाजिक कार्यकर्ते निलेश धापटे यांनी सूत्रसंचालन केले, तर आभार प्रदर्शन नानासाहेब खरात यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.या वेळी अमर भैया जगदाळे, दीपिका शिरसागर, गणेश लंबाते, भाग्यश्री बोडके, लक्ष्मण वाघमोडे, दिलीप पाटील, पोपट पवार, अमोल इंगळे, राजेश पवार, सद्दाम बागवान, मनीषा वाघ, शकुंतलताई जगताप, माधुरी जगताप, संदीप रेडके, गणेश शिंगाडे, विशाल म्हेत्रे, अण्णा गायकवाड, सोनू सय्यद, गौरव राऊत, अरबाज बागवान, सोनाली बोडके, निर्मला जाधव, रेश्मा शेख, नारायण हरणावळ, रुपेश वाघमोडे, अभिजीत रेडके आणि इतर अनेक सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'वृक्षारोपण महायज्ञ' उपक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल 'राष्ट्रीय सरपंच संसद' चे सर्व पदाधिकारी आणि अधिकारी वर्गाने अभिनंदन केले आणि वृक्षारोपणात सहभाग घेतला.